# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २१/०७/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २१/०७/२००६ रोजी सभा सुचना क्र. ०८ दि. १७/०७/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ५) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ६) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ८) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ९) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १०) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ११) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १२) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| १३) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १४) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| २) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग यांचे मी हार्दिक स्वागत करतो आणि सभेला सुरुवात करावी अशी मी सचिवांना सुचना करतो.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, मिरा भाईंदर हद्दीमध्ये पाण्याचे प्रेशर कमी झालेले आहे.

**शिवाजी बारकूंड :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, मिरा भाईंदर शहरामध्ये आठ-दहा दिवसापासुन संपूर्ण वॉर्डमध्ये पाणी टंचाई झालेली होती. ठाणे आणि मिरा भाईंदरसाठी शहाड-टेमघरवरुन जे पाण्याचे कनेक्शन येते. मध्यंतरी ते कमी आलेले होते. त्यासंबधी विचारणा केली असता तिथे काहीतरी लिकेज असल्याचे समजलेले होते. त्यामुळे त्याचा फटका मिरा भाईंदरला बसलेला आहे. आम्ही गेलो आणि ते काम ९.१५ वा. पूर्ण केले. तेव्हा रात्री १.१५ वा. पाणी चालू झाले. आम्ही दोन तीन दिवसापूर्वी ते पाणी सोडले. परंतु, मध्यंतरी संपूर्ण शहरात पाणी कमी प्रमाणात आले होते.

**सुर्यकांत भोईर :-**

आमच्याकडे एक महीन्यापासून पाणी कमी येत आहे.

**शिवाजी बारकूंड :-**

सध्या पाणी कमीच येत आहे. आम्ही जे नंबर दिलेले आहेत. त्यांना कमिशनर साहेबांनी पत्र दिलेले आहे. त्या जागेवर जे अधिकारी आहेत त्याची बदली करुन दुसरे अधिकारी नेमण्याबाबत काल काम चालू असताना ऑर्डर आलेली होती. त्या सर्व अधिका-यांची बदली उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये झालेली आहे. बाकीचे जे इंजिनीयर आहेत. त्यांची बदली दोन-तीन दिवसामध्ये होईल.

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदरमध्ये ज्यावेळेला टँकरद्वारे पाणीपुरवठा होत होता त्यावेळेला पण्याची स्थिती बरोबर नव्हती. टँकर बंद केल्यानंतर जवळ जवळ पाच एम.एल.डी पाण्यात फरक पडलेला होता. परंतु, टँकर बंद

केलेले असतानासुद्धा लोकांना योग्य प्रमाणात आणि सुरळीत पाणी मिळत होते. आता पाण्याचे प्रेशर कमी झालेले आहे. त्यामुळे लोकांना पाणी मिळत नाही. टँकर नसल्या कारणाने लोकांना पाणी कमी मिळते. म्हणून टँकर बंद केलेले आहे. त्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. टँकर बरे होते की टँकर नसताना लोकांना पाणी मिळत नाही. म्हणून दुसरा टँकर कुठून मागवायचा? असा प्रश्न निर्माण झालेला आहे. जर टँकरपेक्षा कमी प्रेशरने पाणी येते तुम्ही त्या टाक्या भरुन घेतात का? परंतू, जर आपली उंच टाकी भरली तर पाण्याचा प्रश्न येत नाही. तुम्ही येणाऱ्या पाण्याचे वितरण करायला सुरुवात करा. टाकी भरली तर पाण्याचा प्रश्न येणार नाही. तुम्ही त्या सिस्टिममध्ये काही बदलाव केला का?

**शिवाजी बारकूंड :-**

आपल्या बदलाबाबत बोलायचे तर मी असे सांगेन की आपल्या शहराला ज्या ठिकाणाहून पाणी येते. तेच पाणी कमी येत आहे. आपण जे पाणी दोन तास भरत होतो ते पाणी एक दिड तासावर आलेले आहे. त्यामुळे पाणी कमी येत आहे. हे पाणी टाकीमध्ये भरतच नाही. त्या पाण्याची लेव्हलच होत नाही.

**मोहन पाटील :-**

साहेब, लेव्हल होत नाही म्हणजे काय?

**सुर्यकांत भोईर :-**

गेल्या एक महीन्यापासुन पाण्याचे प्रेशर डाऊन आहे.

**प्रभात पाटील :-**

आपण आपल्या शहरातील प्लॅस्टिकच्या पिशव्यांवर बंदी आणली आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

प्लॅस्टिकच्या पिशव्यांवर शासनाने बंदी आणली आहे आणि आपण त्याची अंमलबजावणी करित आहोत.

**प्रभात पाटील :-**

माझ्या माहितीप्रमाणे या पिशव्यांवर शासनाची बंदी नाही. कारण कुठेही तुम्ही नवघर रोडला भाजी मार्केटला गेलात तर भाजीवाला किंवा फेरिवाला असे कोणीही तुम्हाला पिशवी देतील. हे कुठेतरी थांबले पाहिजे. हे मला तुमच्या निदर्शनाला आणायचे आहे. आपण प्लॅस्टिकच्या पिशव्या बंद केल्या परंतु त्याचे तंतोतंत पालन केले जात नाही . आपल्याला याचा किती त्रास होतो हे कोणाला सांगायाची गरज नाही.

**एस्. ए. खान :-**

प्लॅस्टीकच्या पिशव्यांना बंदी घातल्याबाबत शहरामध्ये मोठमोठे बोर्ड लावा. आपण प्लॅस्टीकच्या पिशव्यांच्या बंदिबाबत प्रभाग कार्यालयासमोर बोर्ड लावले तर आपल्याला प्लॅस्टीकच्या पिशव्या वापरण्याबाबत आळा घालता येईल . मी सभापती साहेबांनी ही कल्पना दिलेली होती.

**सुर्यकांत भोईर :-**

परंतु प्लॅस्टीकच्या पिशव्याबाबत बोर्ड लावण्याचे अधिकार कोणाला आहेत?

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब प्लॅस्टीकच्या पिशव्यांवर बंदी घालण्याचे अधिकार आपल्याला आहेत की, पोलिसांना आहेत ते सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्लॅस्टीकच्या पिशव्यांवर बंदी घालण्याचे अधिकार आपल्याला आहेत.

**प्रभात पाटील :-**

प्लॅस्टिकच्या पिशव्यांवर बंदी घालण्याचे अधिकार कॉर्पोरेशनला आहेत.

**जयंत पाटील :-**

मागच्या वेळेला पोलिसांनी प्लॅस्टीकच्या पिशव्यावर बंदी घातलेली होती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

ह्या पातळीवर जी एक समिती आहे त्यात पोलिस आणि महापालिका मिळून कारवाई करतात.

**एस्. ए. खान :-**

पोलिस आणि महापालिका एकत्रितपणे कारवाई करतात. हे बरोबर आहे. परंतू, प्लॅस्टिकच्या पिशव्यांवर बंदी घालण्यात आलेली आहे हे समजण्यासाठी रस्त्यावर बोर्ड लावा. आम्ही मिरारोडला नो प्लॅस्टीक झोनचे बोर्ड लावलेले आहेत. आम्ही स्वतःहूनच नागरिकांच्या जागरूकतेसाठी प्लॅस्टीक मुक्तीचा बोर्ड लावलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

आजच्या परिस्थितीमध्ये कचरा उचलला जात नाही ही एक गंभीर समस्या आहे.

**एस्. ए. खान :-**

कचरा उचलण्याचे काम चालू आहे.

**प्रभात पाटील :-**

मिटींगमध्ये असे वाद नेहमी येत असतात.

**जयंत पाटील :-**

कचरा उचलण्याबाबत काम झाले? आपल्या प्रभागात डम्पर चालू झाले का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

डम्परने कचरा उचलण्याचे काम चालू केलेले आहे.

**ज्युडी डिसोजा :-**

परंतू, आमच्या प्रभागात कचरा तसाच पडलेला आहे.

**रमेश जैन :-**

आठ दिनसे हमारे यहाँ कचरा उठाया नही है। कचरा जमा होनेसे बहुत बदबू मार रही है और उससे बिमारीभी फैल रही है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आता या ठिकाणी श्री. राजकुमार कांबळे साहेब उपस्थित नसतील तर तुम्ही आरोग्य विभागाच्या उपायुक्तांना बोलवा.

**प्रभात पाटील :-**

सध्या संपूर्ण मुंबईमध्ये गॅस्ट्रो, डेंग्युसारख्या साथीच्या रोगाची लागण सुरू झालेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही या रोगांबाबतची माहिती सांगण्यासाठी डॉक्टरांना बोलवा. आज साथीचे रोग वाढत चाललेले आहेत. आज आपल्या मिरा भाईंदर महापालिका क्षेत्राची काय परिस्थिती आहे? आज आपल्या परिसरात या रोगाची सुरूवात झाली तर आपल्या मिरा भाईंदर महापालिकेने त्याबद्दल काय उपाययोजना केलेल्या आहेत? त्या सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

कचऱ्याच्या अनुषंगाने प्रॉब्लेम आलेला होता. आपण मागे दोन दिवस कॉलेजच्या बाजुला कचरा टाकत होतो. तिथल्या नागरिकांनी तिथे कचरा टाकण्यास विरोध केलेला आहे. त्या अनुषंगाने आपल्याकडे ४० एकर जागेचे जे काम प्रगतीपथावर आहे. त्या अनुषंगाने निविदेची कार्यवाहीसुद्धा प्रगतीपथावर आहे. दरम्यानच्या काळामध्ये पर्यायी जागा उपलब्ध व्हावी म्हणून फॉरेस्ट डिपार्टमेंटशी संपर्क करून आणि त्या जागेचे जे कोणी कब्जेदार किंवा वहिवाटदार आहेत किंवा ज्यांचे जागेला नाव आहे. त्यांच्याशी चर्चा करून त्यांची संमती घेऊन कचरा टाकण्याचे काम अंतिम केलेले आहे. आता त्या ठिकाणी कचरा गोळा होत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्याच्याप्रमाणे एक नोंद होणे आवश्यक आहे की, भाईंदर पश्चिमेचे जे ठेकेदार आहेत. ते लोक त्या ठिकाणी कचरा टाकत नाही. कारण की त्याच्यामुळे लीड जास्त मिळते. म्हणजे इतर ठिकाणी जास्त डिझेल लागते. म्हणून ते कचरा टाकत नाहीत. यासाठी भाईंदर पश्चिमेचा कचरा जशाच्या तसा पडलेला आहे.

**रमेश जैन :-**

पिछले पाँच दिनसे कचरा वैसेही पडा हुआ है।

**प्रभात पाटील :-**

साहेब, भाईंदर ईस्टच्या कचरासुद्धा उचलला जात नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

भाईंदर ईस्टचा कचरासुद्धा उचलला जात नाही

**रतन पाटील :-**

वेस्ट आणि ईस्ट मध्ये काहीही फरक नाही. फक्त अर्धा किलोमीटरचा फरक असेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

काल संध्याकाळी त्या जागेसंबंधीचे वाद मिटलेले आहेत. आम्ही तो संपूर्ण कचरा तिथे शिफ्ट करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मी स्वतः त्यावेळी त्या ठिकाणी हजर होतो. मा. उपायुक्त साहेब, ठेकेदारांनी फक्त हायवेजवळचा कचरा उचललेला आहे. परंतु, भाईंदर पूर्वचा आणि पश्चिमेचा कचरा उचलेला नाही. त्याबाबत तुम्ही त्यांना सुचना द्या.

**जयंत पाटील :-**

परवाच्या दिवशी घनकचरा निर्मुलनासाठी जी मिटींग झाली त्या मिटींगला मोहन पाटील साहेब हजर नव्हते. घनकचरा निर्मुलनासाठी तळोज्याला जायचे असे एका सांगितले होते. ते काय कितपत पॉसिबल आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कचरा तळोज्याला ट्रान्सपोर्ट करणे पॉसिबल नाही. कारण त्याचा खर्च खूप आहे.

**जयंत पाटील :-**

तो वेगळा भाग आहे. त्याबाबत कुठलीही नगरपालिका, किंवा महानगरपालिका तुम्हाला मान्यता देणार नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तळोज्याला कचरा निर्मुलन करण्याचे दोन प्रकारचे वेस्टचे ट्रिटमेंट प्लँन्ट आहेत आणि आपण ज्याप्रमाणे ४० एकर जमिनीवर प्लॅन करतो. त्याचप्रमाणे ती लोक असा व्हेस्ट प्रोजेक्ट तयार करतात. त्याठिकाणी कुठल्याही प्रकारचे फायनल प्रोसेसिंग झालेले नाही. फक्त तळोजा एम.आय.डि.सी. मध्ये जे मेडिकल वेस्टेज आहे. ती बर्निंग फॅसिलिटी आहे. त्यामुळे तळोजाहून पूर्ण कचरा नेणे शक्य नाही.

**जयंत पाटील :-**

सगळा कचरा एकदम एका दिवसात नेणे शक्यच नाही. दिवसातून फक्त एक ट्रक जाऊ शकतो.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आपल्याला एवढा खर्च करणे शक्य नाही. म्हणूनच आपल्याला आपली अशी स्वतंत्र योजना करावी लागेल. आणि आपल्याला त्या अनुरूप काम करावे लागेल.

**जयंत पाटील :-**

आयुक्त साहेब मला वाटते तीन आयुक्त झाले ही योजना राबविता राबविता....

**एस. ए. खान :-**

श्री. कांबळे साहेबांना नगरसेवक श्री. नरेंद्र मेहता साहेब यांनी कचरा टाकण्यावरून मारहाण केल्या बाबतची चर्चा सध्या शहरांत सुरू आहे ती खरी आहे का?

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. नरेंद्र मेहता यांनी मारहाण न करता शिवीगाळ केल्याचे ऐकिवात आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कार्यालयाकडे तसा रिपोर्ट मिळालेला नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, ही बातमी पेपरला छापून आलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

परंतु, याचा रिपोर्ट कार्यालयाकडे उपलब्ध नाही.

**एस. ए. खान :-**

मा. उपायुक्त साहेब, टेम्पोचे काय झाले? फाटकाच्या बाजूला उभे असलेले टेम्पो कधी उचलणार? त्याची माहिती द्या.

**रतन पाटील :-**

साहेब, त्या रस्त्याच्या डिव्हायडरचे काम का थांबलेले आहे? याबाबतीत तुम्ही आम्हांला सर्वप्रथम खूलासा द्या. तुम्ही कोणाच्या दहशती खाली किंवा कुणाच्या दमदाटीने ते काम थांबवलेले आहे का? याचा प्रथम खुलासा करा.

**एस. ए. खान :-**

आपली ही चौथी मिटींग चाललेली आहे?

**गजानन भोईर :-**

पुढची मिटींग किती तारखेला आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

पुढची मिटींग २८ तारखेला आहे.

**रतन पाटील :-**

खतगांवकर साहेब, त्या रस्त्याला डिव्हायडर लावण्याचे काम कुणाच्या दमदाटीने बंद केलेले आहे की कुणाच्या दहशतीने बंद करण्यात आलेले आहे. याबाबतीत आम्हाला सविस्तर खुलासा द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या रस्त्याचे काम बंद नाही.

**एस. ए. खान :-**

साहेब, त्या रस्त्याच्या डिव्हायडरचे काम बंद आहे.

**रतन पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, तुम्ही मा. सभापती साहेबांना काम बंद आहे की चालू आहे त्याबाबत विचारा. सिग्नल ते फाटकापर्यंतच्या रस्त्यावर डिव्हायडर लावण्याचे काम का बंद आहे? ते काम कोणी बंद केलेले आहे? ते काम पंधरा दिवस पासून बंद आहे. आपण सिग्नल ते फाटकापर्यंत दोन्ही बाजूला जे डिव्हायडर लावण्याचे काम चालू केलेले होते. ते काम सध्या बंद आहे.

**दिपक खांबीत :-**

तिथे जाळ्या लावायचे काम बाकी राहिलेले आहे ना.

**रतन पाटील :-**

या ठिकाणी जाळ्या लावायचा विषय नाही.

**दिपक खांबीत :-**

सध्या पावसाळा सुरू आहे. म्हणून काम बंद करण्यात आलेले आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही पावसाळ्याची कारणे देऊ नका. पावसाळ्यात ते खांबे उभे राहून पडणार नाहीत. पावसामुळे ते काम बंद झालेले नाही. कुणी तरी दादागिरी करुन ते काम बंद केलेले आहे असे आम्हाला समजलेले आहे. खांबे उभे राहण्याचे कारण नाही किंवा हे काम पावसामुळे बंद झालेले नाही.

**दिपक खांबीत :-**

आपल्याकडे काम करायला लेबर नव्हते. म्हणून काम बंद झालेले आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, लेबर नव्हते असे बोलू नका.

**दिपक खांबीत :-,**

रस्त्याच्या डिव्हायडरच्या कामासाठी लेबरचा प्रॉब्लेम नाही.

**रतन पाटील :-**

काम बंद होण्यामागे काय कारण आहे? ते सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

एखाद्या कामाबद्दल जर काही प्रॉब्लेम असेल तर ते आपण सॉल्व्ह करु.

**जयंत पाटील :-**

ठेकेदार कोण आहे?

**रतन पाटील :-**

हे काम कोणत्या ठेकेदाराकडे आहे?

**दिपक खांबीत :-**

चार-पाच दिवसांपासूनच काम बंद आहे.

**रतन पाटील :-**

चार-पाच दिवसांपासून नाही तर पंधरा दिवसापासून काम बंद आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

श्री. खांबित, तुम्ही स्वतः एकदा जाउन त्या कामाची पहाणी करून या. त्या कामामध्ये काहीही प्रॉब्लेम नाही. कदाचित ठेकेदार ते काम स्लो करित असावा असे मला वाटते.

**रतन पाटील :-**

टेम्पोवाल्यांनी ते काम दादागिरी करून बंद पाडलेले आहे असे माझ्या कानावर आले म्हणून मी तुम्हाला विचारतो.

**मोहन पाटील :-**

हा विषय कधी आलेला होता? हा विषय कधीच निघालेला होता. ही आमची चौथी पाचवी मिटींग आहे. चौथ्या, पाचव्या मिटींगपासून ते डिव्हायडर तिथेच आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तिथुन टेम्पोसुद्धा हलत नाहीत.

**रतन पाटील :-**

साहेब, मी मागच्या मिटींगला बोललो होतो. तसेच, टेम्पो का हलत नाहीत? हे मी परवाच्या मिटींगला सुद्धा बोललो होतो. माझ्याकडे त्याचा प्रस्ताव नाही. मी जे काही बोलतो ते क्लिअर बोलतो.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, सन्मा. सदस्य मोहन पाटील तुमच्या बाजुनेच बोलत आहे.

**मोहन पाटील :-**

श्री. खांबित, त्याठिकाणी गेल्या महिनाभरापासुन काम बंद आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

त्यांनी प्रशासानाकडे तशी मागणी करून काम चालू करायला लावलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, तिथून टेम्पो हलविले जातील का? हो किंवा नाही ते सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

आपण मागच्या सभेत पोलिसांची मदत घेउन कार्यवाही केली जाईल असे बोललो होतो.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही प्रत्येक मिटिंगला तेच बोलता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

आपण मागच्या सभेचेच फायनल केलेले आहे. आपण त्यांना जागा दाखवून दिलेली आहे. आपण त्यांच्या संयुक्त बैठका घेतलेल्या आहेत. त्या बैठकीमध्ये सन्मा. सदस्य मोहन पाटील स्वतः हजर होते.

**प्रभात पाटील :-**

साहेब, मी या ठिकाणी एक वेगळा विषय मांडणार आहे. आपल्याला त्याचे नियोजन अगोदर करणे गरजेचे आहे. कारण मोहन पाटील साहेब सभापती असताना ते काम उशीरा झालेले होते. आता गणेशोत्सव जवळ आलेला आहे. गणपतीचे विसर्जन करताना जे निर्माल्य असते ते तलावात टाकले जाते. जे निर्माल्य कलश असतात ते तुम्ही आधीच मागवा आणि गणपती यायला एक दिड महिन्याचा अवधी आहे. तुम्ही ते निर्माल्य कलश मागवा आणि गणपती विसर्जनाच्या ठिकाणी बसवा. ते सर्व निर्माल्य त्याच्यामध्ये जमा होईल. कारण त्या तलावामध्ये पुष्कळ गाळ जमा होतो. ते निर्माल्य कलश सार्वजनिक तलावाच्या ठिकाणी व्हायला पाहिजेत.

**गजानन भोईर :-**

ते निर्माल्य कलश तलावाच्या ठिकाणी कायमस्वरूपी ठेवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

तुम्ही सांगितलेल्या सुचनांची नोंद घेउन कार्यवाही करू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, आपण नेहमी अतिक्रमणच्या विषयाबाबत चर्चा करतो. तुम्ही आतासुद्धा अतिक्रमणाच्या विषयाबाबत माहिती द्या.

**प्रभात पाटील :-**

मा. सभापती साहेब, मी आपल्यासमोर ज्या गोष्टीची मांडणी केलेली आहे त्याबद्दल आपण दखल घ्यावी.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

आता विषय भरपुर आहेत. त्यामुळे आपण एका-एका विषयांवर चर्चा करूया.

**प्रभात पाटील :-**

साहेब, तुम्ही एका-एका विषयावर चर्चा करा.

**एस. ए. खान :-**

साहेब तुम्ही टेम्पो उचलण्याबाबतची कार्यवाही कधी करणार? ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही टेम्पो स्टॅन्ड कधी करणार? त्याचे रूलिंग द्या. आता आमचे वर्ष संपत आलेले आहे. तुमचे सुद्धा वर्ष संपत आलेले आहे. तुम्ही तुमच्या कारकिर्दीत काहीतरी कामगिरी केली असे दाखवा. तुम्ही आम्हाला फक्त आश्वासनेच देणार आहात का?

**कैलासबेन जानी :-**

आपल्या प्रत्येक मिटिंगमध्ये नेहमी सर्व्हिस रोडची चर्चा होते. आजसुद्धा सर्व्हिस रोडचे अनधिकृत बांधकाम चालू आहे.

**मा. सभापती :-**

मी सन्मा. सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की आता आपला जो डिव्हायडर किंवा सर्व्हिस रोडचा फाटकाच्या रोडवरिल टेम्पोच्या समोरचा जो विषय निघालेला आहे. आपण तो सर्व्हिस रोड २८ तारखेच्या आतमध्ये चालू करूया असा तुम्ही निर्णय घ्या.

**मोहन पाटील :-**

तुम्ही काम चालू करणार एवढेच बोलू नका. टेम्पोचे काम सुरू व्हायलाच पाहिजे.

**मा. सभापती :-**

आम्ही टेम्पोच्या स्टॅन्डचे काम चालु करणार आहोत.

**एस. ए. खान :-**

टेम्पो हटविण्यासाठी पोलिस प्रोटेक्शन घेणार? ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

टेम्पो स्टॅन्ड बाबत सांगा.

**मा. सभापती :-**

त्या रस्त्याच्या मध्ये डिव्हायडर झाल्यामुळे टेम्पोवाले आपोआप पळून जातील असे मी त्यांना सांगितलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

रस्त्याच्यामध्ये डिव्हायडर झाल्यामुळे ट्रॅफिक जाम होईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

रस्त्याच्यामध्ये थोडा गॅप सोडावा लागेल.

**रतन पाटील :-**

रस्त्याच्यामध्ये थोडा गॅप ठेवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण टेम्पोसाठी जो डिव्हायडर बनविणार आहोत. त्याला मध्ये जास्त जागा न ठेवता डिव्हायडर बनवायचा आहे.

**मा. सभापती :-**

टेम्पोवाल्यांना हटविण्यासाठी पोलिसांच्या मदतीचा प्रश्न होता. तो प्रश्न सुद्धा आता सूटलेला आहे. आपल्याला पोलिस बंदोबस्त मिळाल्यानंतर आपण टेम्पो संबंधीचा अहवाल करूया.

**रतन पाटील :-**

साहेब टेम्पोवाल्यांनी फाटक रोड आणि नवघर रोडला पार्क करणे सुरू केलेले आहे.

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, त्या टेम्पोवाल्यांच्या बाबतीत एक महत्वाची अशी बाब आहे की, त्यांना टेम्पो त्यांच्या घरी ठेवायला जागा नाही. परंतु, ते टेम्पो पार्क करायला जागा बुक केलेली आहे.

**प्रभात पाटील :-**

मी मागच्या वेळेला सुद्धा बोलले होते की, टेम्पोवाल्यांनी टेम्पो पार्क करण्यासाठी जागा निर्माण केलेली आहे. परंतु, बाकीचे टेम्पोसुद्धा तिथेच असतात.

**मोहन पाटील :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की, मी काही दिवसांपुर्वी आपल्या आजच्या उपायुक्त साहेबांकडे गेलेलो होतो. त्यावेळेला काही टेम्पोवाल्यांबरोबर त्यांची सविस्तर चर्चा सुरू होती की, आम्ही त्यांना कुठल्या पद्धतीने पर्यायी जागा देउ वगैरेबाबत विषय चालू होता. त्यात मी त्यांना असे सुचवले की, तुम्ही लोकल किती टेम्पो काढले? तो अहवाल आम्हाला द्या.

**मा. सभापती :-**

हासुद्धा महत्वाचा प्रश्न आहे.

**मोहन पाटील :-**

मी हा प्रश्न विचारताच त्यांचा आवाज बंद झाला आम्ही तुमचे टेम्पो शहराच्या बाहेर नेउन टाकणार नाही. तुम्ही या शहराचा एक भाग आहात. आम्हाला या शहराच्या व्यापारीकरणासाठी तुमची वाहतूक पाहिजे. तुम्ही व्यवस्थितरित्या धंदा केल्यावर आमच्या शहराचा विकास होईल आणि आम्हाला ते सांगणे बरे वाटेल. या ठिकाणी तुमचे लोकल टेम्पो आहेत त्या लोकल टेम्पोची संख्या किती आहे? असे विचारताच त्यांचा आवाज बंद झाला. साहेबांना उत्तर मिळाले नाही आणि आम्हाला सुद्धा उत्तर मिळालेले नाही. माझ्या माहितीप्रमाणे लोकल टेम्पोची संख्या पाच टक्के आहे.

**मा. सभापती :-**

लोकल टेम्पोची संख्या पाच टक्केच असेल.

**मोहन पाटील :-**

जर आपल्या शहरात लोकल टेम्पो पाच टक्के असतील तर आपण टेम्पोचा उपयोग आपल्या शहरासाठी केलेला आहे. आपण बाहेरच्या लोकांसाठी टेम्पोचा उपयोग केलेला नाही. त्या लोकांकडे टेम्पो पार्क करायला जागा नाही.

**मा. सभापती :-**

तुम्ही त्या टेम्पोवाल्यांना पार्किंग चार्ज लावा.

**मोहन पाटील :-**

जर स्थानिक लोक असतील तर त्यांना जागा देणे हा आपला अधिकार आहे. तुम्ही या लोकांना कुठेही जागा द्या. जर या शहरात आपले पाच टक्के टेम्पो असतील आणि उरलेले टेम्पो बाहेरचे असतील तर तुम्ही त्यांच्यावर काय कार्यवाही करणार?

**मा. सभापती :-**

आपल्याला अशा टेम्पोवाल्यांना पार्किंगचा चार्ज लावावा लागेल.

**सुर्यकांत भोईर :-**

टेम्पोवाल्यांनी टेम्पो पार्किंगचे भाडे द्यावे असे माझे म्हणणे आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही टेम्पोचा पार्किंग चार्ज लावा. आम्ही त्याला विरोध करणार नाही. परंतु, बाहेरून येणाऱ्या टेम्पोबाबत योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

किती टेम्पो आहेत? याची छाननी करा.

**एस. ए. खान :-**

तुम्ही टेम्पोबाबत छाननी करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण ज्या पद्धतीने मासळीवाल्यांना रू. ६ हजार वर्षाचा टॅक्स घ्यायचा. आपण आता तशा पद्धतीने केले तर आपल्याला पैसे मिळतील.

**मा. सभापती :-**

तुम्ही पोलिसांच्या सहाय्याने प्रत्येक टेम्पोची माहिती घ्या. त्यामुळे ते टेम्पो बाहेरचे आहेत की, स्थानिक आहेत ते आपल्याला समजेल.

**मोहन पाटील :-**

टेम्पोवाल्यांचे जे आर.सी. बुक असते. त्या आर.सी. बुकवर प्रॉपर ॲड्रेस असतो. तुम्ही ते आर.सी. बुक चेक करा. जर भाईदर मधील स्थानिक टेम्पोवाले असतील तर त्यांच्यावर कारवाई करू नका. परंतु, जर भाईंदरच्या हद्दीबाहेरचे टेम्पोवाले असतील अशांवरच कारवाई करा.

**कैलासबेन जानी :-**

प्रत्येक मिटींगला सर्व्हिस रोडच्या अनधिकृत बांधकामा बाबातचा विषय निघतो. आजसुद्धा सर्व्हिस रोडवर अनधिकृत बांधकाम चालू आहे. प्रत्येक मिटिंगला अनधिकृत बांधकामाचा विषय निघतो. तुम्ही त्या अनधिकृत बांधकामाबाबत काय कार्यवाही करणार आहात? ते सांगा. तुम्ही सर्व्हिस रोडची पाहणी करण्यासाठी कोणाला तरी पाठवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही हा विषय मस्करीवर घेउ नका. कारण आपल्या सदस्यांनी विचारलेला प्रश्न योग्य आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, हा विषय मस्करीचा नाही. हा विषय मिरा भाईंदर शहराच्या विकासाच्या दृष्टीने योग्य आहे. साहेब, हा विषय गंमतीचा नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्लानिंगमध्ये जो रोड आहे. त्या रोडबाबत ज्येष्ठ सन्मा. सदस्यांचा प्रश्न आहे. त्यामुळे या विषयावर निर्णय होणे आवश्यक आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही या बांधकामांना परमिशन दिलेली होती का? जर परमिशन दिली नसेल तर त्या ठिकाणी बांधकाम कसे सुरू झाले? याचे उत्तर द्या.

**रतन पाटील :-**

आपल्या शहरात जी अनधिकृत बांधकामे चालू आहेत. त्यांची इन्क्वायरी करा आणि हा विषय सर्वसाधारण सभेमध्ये आणा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अतिक्रमण विभागाच्या इन्चार्जने व्हेरीफिकेशन केलेले आहे का? त्या अनधिकृत बांधकामाचे स्टेटस इन्चार्जला आणायला सांगा.

**कैलासबेन जानी :-**

आता किती अनधिकृत बांधकाम चालू आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझ्या माहितीप्रमाणे अनधिकृत बांधकाम आताच चालू केलेले आहे.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही त्या बांधकामांना परमिशन दिलेली आहे की नाही ते सांगा.

**जयंत पाटील :-**

मी या अनधिकृत बांधकामाबाबत बोलू इच्छित नाही. आपल्या शहरामध्ये असे प्रकार घडत आहेत. अशा प्रकारांना आळा घालणे आपले काम आहे. ही लोक आपल्या शहरात लपून राहू नयेत ही या मागची भावना आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

संबंधित विभागाने याची नोंद घ्यावी आणि आवश्यक ती पाहणी करुन अहवाल तयार करण्यात यावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याकडे असलेल्या इंडस्ट्रीमध्ये कमी पैशाचे काम करणारे १०० टक्के बांगलादेशी लोक आहेत. तुम्ही आपल्या अधिकाऱ्यांना पाहणी करायला पाठवा.

**मा. सभापती :-**

आपण नगरपालिकेतर्फे पोलिस स्टेशनला कळवूया. आमच्या बाजुला श्री. सुरेश ठाकूर नावाचा माणूस राहतो. तो बांधकाम करून देतो. त्याने जी चाळ बांधलेली आहे. त्या चाळीमध्ये सुद्धा बांगलादेशी लोक राहतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण मिटींग संपल्यानंतर मा. आयुक्तसाहेबांकडे अतिक्रमणाच्या विषयाबाबत चर्चा करूया.

**गजानन भोईर :-**

मिटिंग संपल्यानंतर सर्व्हिस रोडवरील अतिक्रमणाच्या विषयावर आयुक्तांशी चर्चा करूया.

**प्रभात पाटील :-**

याठिकाणी दोन मुद्दे उपस्थित झालेले आहेत. सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी टेम्पोचालकाबाबत सांगितलेला मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. ते बोलले की, असे किती टेम्पोचालक आहेत? माझी आता टर्म संपत आलेली आहे. तरीसुद्धा मी याठिकाणी माझा मुद्दा मांडते की, चर्मकार लोकांचे किती स्टॉल आहेत? मी मागच्या वेळेपासून चर्मकार लोकांच्या स्टॉलचे विल्शेषण करण्याबाबत सांगत आलेली आहे. ज्याठिकाणी ज्या माणसाचा स्टॉल आहे. तिथे तो माणूस बसतो की, दुसरा माणूस बसतो. त्याची सुद्धा माहिती द्या. सन्मा. सदस्या प्रभात पाटीलच्या स्टॉलवर सन्मा. सदस्या प्रभात पाटील बसते की, सन्मा. सदस्या ज्युडी डिसोझा बसते याची सुद्धा पाहणी करा.

**सुर्यकांत भोईर :-**

ती लोक ते स्टॉल भाड्याने देतात तुम्ही त्याची इन्क्वायरी करून बघा.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही शाळेच्या मैदानातील टपऱ्या काढल्या का?

**मोहन पाटील :-**

शाळेच्या मैदानावरील टपऱ्या काढलेल्या आहेत.

**प्रभात पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही श्री. तायशेट्येंना मिटिंग बोलावणार असे सांगून पंधरा दिवस झालेले आहेत.

**रतन पाटील :-**

मागच्या वेळीसुद्धा हा विषय आलेला होता.

**एस. ए. खान :-**

मी मागच्या वेळेलासुद्धा श्री. खतगांवकर साहेबांना टपऱ्या काढण्याबाबत सांगितलेले होते. परंतु, अजुनपर्यंत त्या टपऱ्या काढलेल्या नाहीत.

**कैलासबेन जानी :-**

आपल्या शहरात जेवढे स्टॉल आहेत. तेवढे सगळे रु. ७५/- भाड्याने दिलेले आहेत.

**रतन पाटील :-**

भाईंदरमध्ये चर्मकाराचे स्टॉल आणि टपऱ्या मोठ्या प्रमाणात आहेत. ते सर्व उचलण्याबाबतचा विषय मागच्या सभेमध्येसुद्धा मांडलेला होता. आम्ही सांगतो त्याच्यावर कार्यवाही करण्यात येत नाही.

**एस. ए. खान :-**

अतिक्रमणचा विषयाबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

**रतन पाटील :-**

टपऱ्या का उचलत नाहीत? टपऱ्या उचलण्याबाबत कार्यवाही होणार आहे की नाही ते सांगा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी पी.आय. दाखल केलेली होती. म्हणजेच सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी एन.ओ.सी. गुन्हा दाखल केलेला होता. सन्मा. सदस्य रतन पाटील हे आपल्या समितीचे सदस्य आहेत. तुम्ही एक गुन्हा दाखवून स्टॉल आणि टपरीवाल्यांना जो धाक दाखविलेला होता. आता तो धाक कमी झालेला आहे. जर आपण एका स्पॉटवर अशी कार्यवाही केली तर आपल्याला रु. दोन लाख ते रु. ३ लाख रेव्हेन्यू मिळतो. दुसरी बिल्डिंग बांधली तर आपल्याला रु. १० लाख रेव्हेन्यू मिळतो. आपल्याला आर.सी.सी. चे पैसे मिळत नाहीत. आपल्याला विकासकर मिळत नाही.

**कैलासबेन जानी :-**

मग सत्ताधारकांनी काय करायचे?

**मोहन पाटील :-**

तुम्ही सत्तेचा विषय बाजूला ठेवा.

**मा. सभापती :-**

मी या ठिकाणी टपऱ्यांच्या विषयाबाबत काय करणार आहात एवढंच विचारु इच्छितो.

**रतन पाटील :-**

तुम्ही सगळ्याच टपऱ्या उचला असे मी बोलत नाही. परंतु, ज्या टपऱ्यांना परवानगी दिलेली नाही. तुम्ही त्याच टपऱ्या उचला. ज्यांना परवानगी दिलेली आहे. त्यांना उचलू नका.

**मा. सभापती :-**

आपण चर्मकांराचे स्टॉल आणि टपऱ्या वगैरे उचलण्याची कार्यवाही करायला सांगूया.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण मागच्या वेळेला चर्मकाराच्या अनुषंगाने संबंधित विभागातून ज्या काही सुचना केलेल्या आहेत. आम्ही त्याप्रमाणे सर्व्हे चालू केलेला आहे. त्यांचा इन्स्पेक्शन अहवाल कधी मिळेल?

**एस. ए. खान :-**

मिरा रोडला मेन रोडवर टपऱ्या वगैरे तशाच ठेवलेल्या आहेत. मी एस. व्ही. रोडबाबत बोलत आहे.

**प्रभात पाटील :-**

मी या गोष्टीबाबत वर्षानुवर्षे बोलत आहे.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५१ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

हा विषय मंजुर आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही या विषयाच्या बजेटची माहिती द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही या विषयाच्या बजेटची माहिती द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या विषयाचा गोषवारा आलेला आहे का?

**मोहन पाटील :-**

या विषयाचा गोषवारा नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपल्याकडे रु. १३ लाख ६ हजार ५०० ची अंदाजपत्रकीय तुरतुद आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आम्ही आमच्याप्रमाणे कामे करतो. आम्हाला अशी पत्रे आलेली आहेत की संबंधित कमे प्रभाग समिती व नगरसेवक निधीतुनच करावीत. दुसरी कोणतीही कामे काढू नका. जर अतिशय महत्वाची कामे असतील तरच घ्या. कारण आपल्याकडे निधी उपलब्ध नाही. आम्हाला अशा प्रकारची पत्रे आलेली आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही हे विषय कसे आणता? तुम्ही म्हणता निधी उपलब्ध नाही मग तुम्ही निधी कुठून आणता? तुम्ही नगरसेवक निधी वापरा किंवा प्रभाग समितीचा निधी वापरा.

**मोहन पाटील :-**

तुम्ही जुन्या सभापतींना किती कामे देणार? नवीन सभापतींनासुध्दा कामे द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

याच्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागात तरतुद आहे. अर्थसंकल्पीय तरतुद असल्यामुळे तो प्रस्ताव या ठिकाणी आलेला आहे.

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे मार्केटबाबत तरतुद आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

मी इतिवृत्तांताबाबत बोलत नाही. त्या गार्डनचे काम चालू आहे का? माझ्या माहितीप्रमाणे मुन्शी कंपाऊन्डच्या बाजुच्या गार्डनचे काम बंद झालेले आहे.

**दिपक खांबित :-**

आता गार्डनचे काम बंद झालेले आहे. परंतु, लॅन्ड स्केपिंगचे काम करणे बाकी आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

या गोष्टीला आता दिडवर्षे झालेले आहे. त्यावेळेला मी स्थायी समितीचा मेंबर नव्हतो. ते काम त्या रोडने चालू झालेले आहे. त्यावेळेला रु. साडे बारा लाख पास झालेले होते. ते काम ही चालू झालेले होते. त्यानंतर ते काम अचानक बंद झाले. ते बंदच राहिले. आजपर्यंत ते काम चालू झालेले नाही. आता त्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य झालेले आहे.

**दिपक खांबित :-**

आम्ही त्या कामाला परवानगी देऊ.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, तुम्ही असे उत्तर किती दिवस देणार आहात?

**दिपक खांबित :-**

मुन्शी कंपाऊन्डच्या बाजुच्या गार्डनचे कंपाऊन्ड पूर्ण झालेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

त्या गार्डन्च्या कंपाऊन्डचे काम वगैरे सर्व काही पूर्ण झालेले आहे. गेटसुध्दा लागलेला आहे आणि बाहेरची सगळी कामे पूर्ण झालेली आहेत. परंतु, आतील काम तसेच राहिलेले आहे.

**दिपक खांबित :-**

त्यावेळेला तिकडच्या काही लोकांनी त्या ठिकाणी शाळा बांधा असे सांगितलेले होते.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, तिकडे शाळा बांधू नका.

**दिपक खांबित :-**

त्या ठिकाणी शाळा किंवा मार्केट वगैरे बांधण्याचे ठरविलेले होते. परंतू, आता त्या ठिकाणी जास्त काम नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

त्या ठिकाणी जास्त काम नाही.

**दिपक खांबित :-**

मग आपण आहे ते काम पूर्ण करुया.

**सुर्यकांत भोईर :-**

आभारी आहे.

(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर यांनी प्रकरण क्र. ५१ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

कसल्या शेडबाबत बोलत आहेत.

**जयंत पाटील :-**

मासळी शेडबाबत बोलत आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

मार्केटच्या शेडचे काम पूर्ण झाल्यानंतर व्यायामशाळा बांधायचा प्रस्ताव आहे.

**दिपक खांबित :-**

आपल्या मार्केटच्या शेडवर व्यायामशाळा बांधता येणार नाही.

**जयंत पाटील :-**

तुम्ही गोषवाऱ्यामध्ये तसे नमुद करायला पाहिजे. तुम्ही हा गोषवारा अर्धवट का आणला?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

आपण व्यायामशाळेचा खर्च ह्याच्यामध्ये इनक्लुड केलेला आहे का?

**दिपक खांबित :-**

आपण वरचा एक मजला घेतलेला आहे. आपण जी प्लस एक मजला घेतलेला आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही गोषवाऱ्यामध्ये नमुद कलेले नाही. म्हणून याचा ठराव करुन घ्या.

**ज्युडी डिसोझा :-**

गोषवाऱ्यामध्ये काहीही नमुद केलेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

जो काही पहीला मजला होईल तो व्यायामशाळेसाठी वापरण्यात यावा असे गोषवाऱ्यामध्ये नमुद करुन घ्या.

**मोहन पाटील :-**

आपण ते गोषवाऱ्यामध्ये नमुद केलेले आहे. आपल्याला या गोषवाऱ्यासाठी फक्त मंजूरी घ्यायची आहे.

**प्रकरण क्र. ५१ :-**

घोडबंदर साईनाथ सेवानगर येथे मासळी मार्केट शेडची पुर्नःबांधणी करणेकामी प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ५३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत घोडबंदर साईनाथ सेवानगर येथे जुने मासळी मार्केट शेड असुन सदर शेड मोडकळीस आलेले आहे. सदर शेड तोडून आर.सी.सी. शेड बांधावयाचे आहे. सदर शेड बांधणे कामी रू. १३,०६,५००/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर कामी सन २००६-०७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध आहे. सदर मासळी मार्केट शेडवर पहिल्या मजल्यावर व्यायामशाळा बांधण्यात यावी. तरी सदर मासळी मार्केट शेड व व्यायामशाळा बांधणे कामी खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५२ चे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, या ठिकाणी असा विषय आलेला आहे की, आता गणेशोत्सवाला अवघे १५ दिवस राहिले आहेत. आपल्या पालिकेचे काम हळुवार चाललेले आहे. आम्ही आता आर्थिक व प्रशासकीय मान्यता मागितलेली आहे. आता हे इतिवृत्तांत मंजूर होणार, नवीन टेन्डर निघणार त्याला मुदत देणार आपल्याकडे एवढा कालावधी नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याकडे जेवढे इतिवृत्तांत आहेत. तेवढ्या इतिवृत्तांतांना मंजूरी देऊन टाका.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण गेल्यावर्षी दिलेल्या कालावधीप्रमाणे यावर्षीसुद्धा मुदतवाढ द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

आता जे आहेत. त्यांना मुदतवाढ द्या.

**दिपक खांबित :-**

आता असलेल्यांनाच मुदतवाढ द्या.

**एस. ए. खान :-**

जर एका माणसाकडून काम होत नसेल तर कामाची विभागणी करुन दोन माणसांकडे कामे द्या. कामाची विभागणी करा. जर एकाच माणसाला सगळीकडे धावाधाव करावी लागत असेल तर दोन माणसांमध्ये कामाची विभागणी करा.

**मोहन पाटील :-**

सध्या काम कोणाकडे आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

माझी याच्यामध्ये अशी एक सुचना आहे की आपल्याकडे जेवढे तलाव आहेत त्याच्यासाठी फायबरचे कलश किंवा निर्माल्य कलश असतात. त्याचीसुद्धा सोय करा. याचीसुद्धा एक ॲडिशनल नोंद करुन घ्या.

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे तलावाच्या ठिकाणी निर्माल्य कलश आहेत. आपली गेल्यावर्षी घाई होती. म्हणून आपण निर्माल्य कलश बसवू शकलेलो नव्हतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

प्रत्येक तलावाच्या ठिकाणी कायमस्वरुपी निर्माल्य कलश बसवा.

(सन्मा. सदस्य श्री. मोहन पाटील यांनी प्रकरण क्र. ५२ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

आपण याला मुदतवाढ द्यायची आहे का?

**मोहन पाटील :-**

आपण या विषयाबाबत संबंधित ठेकेदाराला मुदतवाढ देत नाही. आपण याबाबत निविदा मागवायची आहे.

**प्रभात पाटील :-**

परंतु, निविदा मागवूनसुद्धा वेळ नाही ना.

**मोहन पाटील :-**

तुम्ही निविदा मागवा. परंतु, निविदा मागविताना एका वेळी एकच काम घेउ नका. कारण याच्यामध्ये विविध कामे आहेत. आपली विविध कामे वेळेवर होत नाहीत. म्हणून तुम्ही त्याबाबत निविदा मागवा. कारण याच्यामध्ये स्टेज, टपऱ्या, जलसोय, निर्माल्य कलश वगैरेची वेगवेगळी कामे आहेत. तुम्ही या सर्व कामांची स्क्रुटिनी करून कामे करा.

**प्रकरण क्र. ५२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्वधर्मीय उत्सवांतर्गत श्री गणेशोत्सव, नवरात्र उत्सव, ईद, गणगौर, कार्तिक पौर्णिमा, छटपुजा, वेलंकनी उत्सव, जनता दरबार व इतर सांस्कृतीक कार्यक्रमाकरिता विविध व्यवस्था करणे कामास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ५४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीची एकूण लोकसंख्या सुमारे ८.०० लक्ष एवढी असून शहरात सर्वधर्मिय नागरीक एकत्रितपणे राहत आहेत. सदर विविध धर्मिय नागरीकांमार्फत विविध सण एकत्रितरीत्या मोठ्या उत्सवाने साजरे केले जातात. सदर सणामध्ये प्रामुख्याने श्री गणेशोत्सव, गुजराथी समाजाचा नवरात्र उत्सव, मुस्लिम समाजाचा इद, राजस्थानी समाजाचा गणगौर, जैन समाजाचा कार्तिक पोर्णिमा, छटपूजा, ख्रिश्चन समाजाचा वेलंकनी उत्सव इ. सण साजरे केले जातात. तसेच पालकमंत्री यांच्या जनतादरबारावेळी सुद्धा विविध व्यवस्था करावी लागते.

श्री गणेश विसर्जनाकरिता शहरातील सर्व तलाव, भाईंदर पूर्व व पश्चिम धक्का, उत्तन, घोडबंदर घाट येथे मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. सदर ठिकाणी लाईटस, हॅलोजन, लाकडी रेलिंग, उंच स्टेज, मंडप, स्वागत कमानी, गेट, जनरेटर, टेबल, खुर्च्या, स्पीकरसेट, बोटी, लाकडी तराफे, निर्माल्य विसर्जनाकरिता टाक्या पुरवठा करणे इ. व्यवस्था करवी लागते. इतर समाजाच्या कार्यक्रमावेळी देखिल भाईंदर पुर्व व पश्चिम धक्का येथे वरील प्रमाणेच व्यवस्था करावी लागते. महानगरपालिकेमार्फत सदर कामे दरवर्षी वार्षिक मुदतीच्या निविदा मागवून ठेकेदारास कार्यादेश द्यावे लागणार आहेत. सदर कामे करण्याकरिता सन २००६-०७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रूपये ४०,००,०००/- लक्ष तरतूद आहे. तरी प्रस्तावात नमुद सर्व व्यवस्था करण्याकरिता येणाऱ्या रू. ४०.०० लक्ष खर्चास व सर्व कामे करण्याकरिता निविदा मागविण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५३ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान यांनी प्रकरण क्र. ५३ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

श्री. खानसाहेब, याची एकुण किती तरतुद आहे?

**एस. ए. खान :-**

तुम्ही गोषवारा वाचा. त्याच्यामध्ये अंदाजाने रू. २१ लाख असे लिहलेले आहेत.

**मा. उपायुक्त (मु.) सोा :-**

नं. १ साठी अंदाजित किती रक्कम आहे?

**एस. ए. खान :-**

अंदाजे रक्कम लिहिलेली आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

नं. १ साठी रू. २१ लाख ६९ हजार ४०५ अशी रक्कम आहे. नं. २ साठी रू. २२ लाख ७६ हजार १४० अशी रक्कम आहे.

**मा. सभापती :-**

सदर विषय मंजुर आहे.

**प्रकरण क्र. ५३ :-**

निवीदांना मंजुरी देणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ५५ :-**

दि. ०६/०६/२००६ रोजीच्या दै. सकाळ या वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीर निविदे सुचनेनुसार (निविदा सुचना क्र. ३) प्राप्त निविदाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) मिरारोड शांतीनगर सेक्टर-१० येथील मलनिःसारण केंद्राची देखभाल दुरूस्ती करणे
(अंदाजित रक्कम रू. २१,६१,४०५/-)

| | **ठेकेदाराचे नाव** | **निविदेचा दर** |
|---|---|---|
| १) | मे. ॲकॉर्ड मार्केटिंग ॲन्ड सर्विसेस | १% (वाटाघाटीअंती ०.५% जादा) |
| २) | मे. ओमकार एंटरप्राईजेस | १% जादा |
| ३) | मे. किशन कंस्ट्रक्शन | ११% जादा |

२) मिरारोड शांतीनगर सेक्टर-३ येथील मलवाहिनी व उदंचन केंद्राची देखभाल दुरूस्ती करणे

(अंदाजित रक्कम रू. २२,७६,१४०/-)

| ठेकेदाराचे नाव | निविदेचा दर |
|---|---|
| १) मे. ॲकॉर्ड मार्केटिंग ॲन्ड सर्विसेस | ३% (वाटाघाटीअंती २.५% जादा) |
| २) मे. किशन कंस्ट्रक्शन | ५.५% जादा |
| २) मे. ओमकार एंटरप्राइर्जेस | ६.८% जादा |
| ३) मे. अरूण कॉन्ट्रक्टर कंपनी | १४% जादा |

३) मिरारोड शांतीनगर सेक्टर-८ येथील मलवाहिनी व उदंचन केंद्राची देखभाल दुरूस्ती करणे (अंदाजित रक्कम रू. २४,४९,७४०/-)

| ठेकेदाराचे नाव | निविदेचा दर |
|---|---|
| १) मे. ॲकॉर्ड मार्केटिंग ॲन्ड सर्विसेस | ३% (वाटाघाटीअंती २.५% जादा) |
| २) मे. किशन कंस्ट्रक्शन | ४% जादा |
| २) मे. ओमकार एंटरप्राइर्जेस | ७.५% जादा |
| ३) मे. अरूण कॉन्ट्रक्टर कंपनी | १४% जादा |

उपरोक्त निविदांचा तुलनात्मक तक्ता पाहता अनुक्रमांक १ च्या कामाकरिता मे. ॲकोर्ड मार्केटिंग ॲन्ड सर्विसेस यांची ०.५% जादा दाराची, अनुक्रमांक २ च्या कामाकरिता मे. ॲकोर्ड मार्केटिंग ॲन्ड सर्विसेस यांची २.५% जादा दाराची व अनुक्रमांक ३ च्या कामाकरिता मे. ॲकोर्ड मार्केटिंग ॲन्ड सर्विसेस यांची २.५% जादा दाराची निविदा लघुत्तम आहे. निविदाकाराने वाटाघाटी अंती सादर केलेले दर हे वाजवी व रास्त वाटत असल्याने वरील तीनही कामांकरीता मे. ॲकॉर्ड मार्केटिंग ॲन्ड सर्विसेस यांची निविदा मंजूर करणेस व याकामी वेळोवेळी येणारी देयके प्रदान करणेस मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५४ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

सदर विषयाचा गोषवारा नसल्यामुळे आपण हा विषय पुढच्या वेळेला घेऊया.

**दिपक खांबित :-**

जनरेटरचा विषय घ्या.

**मोहन पाटील :-**

आपण बांधकामाचा दुसरा कुठलाही विषय घेतला नसता. परंतु, जनरेटर ही एक आवश्यक बाब आहे. त्यामुळे जनरेटरचा विषय घेण्यात यावा.

**गजानन भोईर :-**

आपल्याकडे सध्या या विषयाचा गोषवारा उपलब्ध नाही. म्हणून सदरचा विषय पुढच्या वेळेला घेण्यात यावा.

**दिपक खांबित :-**

मी सदर विषयाचा गोषवारा देईन तुम्ही हा विषय पुढच्या वेळेला घ्या.

**प्रकरण क्र. ५४ :-**

निवीदांना मंजुरी देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ५६ :-**

दि. २९/०६/२००६ रोजी ''दै. जन्मभुमी / दैनिक सागर'' या वृत्तत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खलील कामाकरिता ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत. सदर कामाकरीता सन २००५-०६ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद उपलब्ध आहे. सदर कामास मा. स्थायी समिती सभा दि. १५/०६/२००६ ठराव क्र. ३१ अन्वये प्रशासकिय / आर्थिक मान्यता प्राप्त आहे.

| अ.क्र | कामाचे नाव / ठेकेदाराचे नाव |
|---|---|
| १. | मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीमध्ये Diesal Generater Set 380 KVA, 320 KVA, 250 KVA, 200 KVA क्षमतेचे डिझेल जनरेटर सेट संपूर्ण बांधकामासह पुरवठा करून बसविणे. कार्यान्वित करून देखभाल करणे. |

## 1´ mao.Aaid%yaa [lao@T/Iklsa

| Sr. No | Description | 200 KVA | 250 KVA | 320 KVA | 380 KVA |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Supply of D.G. Set along with Acoustic Enclosure | 2706046.00 | 3572016.00 | 4388397.00 | 5022645.00 |
| | | | | | |
| 2 | AMF Panel | 516645.00 | 584370.00 | 777870.00 | 777870.00 |
| 2 | Civil Foundation for D.G. Set . | 96750.00 | 116100.00 | 116100.00 | 116100.00 |
| | | | | | |
| 3 | Exhaust Piping of 125 mm Dia M.S. pipe With flanges, bends & Support (One Run) | 23220.00 | 29025.00 | 29025.00 | 29025.00 |
| | | | | | |
| 4 | Transportation | 36980.00 | 40850.00 | 40850.00 | 40850.00 |
| | | | | | |
| 5 | Fuel piping | 19350.00 | 19350.00 | 19350.00 | 19350.00 |
| | | | | | |
| 6 | Insulation of Exhaust piping with 50 mm thickness Glass Wool, Chicken mesh & alluminium Cladding (Including Residential Silencer) | 11610.00 | 17415.00 | 17415.00 | 17415.00 |
| | | | | | |
| 7 | Alluminium armoured Cable Suitable as per KVA of Generators. | 77400.00 | 106425.00 | 139320.00 | 139320.00 |
| | | | | | |
| | | | | | |
| 8 | 12core x 2.5 Sq mm Copper armoured Control with termination. | 9675.00 | 9675.00 | 9675.00 | 9675.00 |
| 9 | Terminations of cable with lugs & glands. | 19350.00 | 19350.00 | 19350.00 | 19350.00 |
| | | | | | |
| 10 | Earthing Stations With 300x300x4mm G.I earth plate. | 58050.00 | 58050.00 | 58050.00 | 58050.00 |
| | | | | | |
| 11 | 25x3mm G.I Strip for earthing | 29025.00 | 29025.00 | 29025.00 | 29025.00 |
| 12 | MS Cable Entry Box Extension for Altermator | 13545.00 | 19350.00 | 19350.00 | 19350.00 |
| | | | | | |
| 13 | Consumables ie Diesel | 75000.00 | 100000.00 | 110000.00 | 115000.0 |
| | | | | | |
| 14 | Battery Charging, Battery Stand. | 5805.00 | 5805.00 | 5805.00 | 5805.00 |
| | | | | | |
| 15 | Commissioning of the D.G Set on available load. | 19350.00 | 19350.00 | 19350.00 | 19350.00 |
| | | | | | |
| 16 | Liasioning Charges for PWD Electrical NOC drawing approval & registration of D.G Set (official fees to you account) | 48375.00 | 58050.00 | 61920.00 | 61920.00 |
| | **Total** | **3766176.00** | **4804206.00** | **5860852.00** | **6500100.00** |

## 2´ mao.idvyaa [lao@T/Ik ka^pao-roSana

| Sr. No | Description | 200 KVA | 250 KVA | 320 KVA | 380 KVA |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Supply of D.G. Set along with Acoustic Enclosure | 2750000.00 | 3650000.00 | 4425000.00 | 5050000.00 |
| | | | | | |

| Sr. No | Description | 200 KVA | 250 KVA | 320 KVA | 380 KVA |
|---|---|---|---|---|---|
| 2 | AMF Panel | 545000.00 | 610000.00 | 805000.00 | 805000.00 |
| 2 | Civil Foundation for D.G. Set . | 110000.00 | 125000.00 | 125000.00 | 125000.00 |
| | | | | | |
| 3 | Exhaust Piping of 125 mm Dia M.S. pipe With flanges, bends & Support (One Run) | 27500.00 | 36000.00 | 36000.00 | 36000.00 |
| | | | | | |
| 4 | Transportation | 40000.00 | 45000.00 | 45000.00 | 45000.00 |
| | | | | | |
| 5 | Fuel piping | 23000.00 | 23000.00 | 23000.00 | 23000.00 |
| | | | | | |
| 6 | Insulation of Exhaust piping with 50 mm thickness Glass Wool, Chicken mesh & alluminium Cladding (Including Residential Silencer) | 14000.00 | 19000.00 | 19000.00 | 19000.00 |
| | | | | | |
| 7 | Alluminium armoured Cable Suitable as per KVA of Generators. | 85000.00 | 115000.00 | 145000.00 | 145000.00 |
| | | | | | |
| | | | | | |
| 8 | 12core x 2.5 Sq mm Copper armoured Control with termination. | 11000.00 | 11000.00 | 11000.00 | 11000.00 |
| 9 | Terminations of cable with lugs & glands. | 21000.00 | 21000.00 | 22000.00 | 22500.00 |
| | | | | | |
| 10 | Earthing Stations With 300x300x4mm G.I earth plate. | 62500.00 | 62500.00 | 62500.00 | 62500.00 |
| | | | | | |
| 11 | 25x3mm G.I Strip for earthing | 31000.00 | 31000.00 | 31000.00 | 31000.00 |
| 12 | MS Cable Entry Box Extension for Altermator | 15000.00 | 23000.00 | 23000.00 | 23000.00 |
| | | | | | |
| 13 | Consumables ie Diesel | 80000.00 | 105000.00 | 115000.00 | 120000.00 |
| | | | | | |
| 14 | Battery Charging, Battery Stand. | 6000.00 | 6000.00 | 6000.00 | 6000.00 |
| | | | | | |
| 15 | Commissioning of the D.G Set on available load. | 25000.00 | 25000.00 | 25000.00 | 25000.00 |
| | | | | | |
| 16 | Liasioning Charges for PWD Electrical NOC drawing approval & registration of D.G Set (official fees to you account) | 50000.00 | 60000.00 | 70000.00 | 75000.00 |
| | **Total** | **3896000.00** | **4967500.00** | **5988500.00** | **6624000.00** |

3´ mao.saurja [lao@T/Ikla va@sa-

| Sr. No | Description | 200 KVA | 250 KVA | 320 KVA | 380 KVA |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Supply of D.G. Set along with Acoustic Enclosure | 2774000.00 | 3683000.00 | 4453000.00 | 5100000.00 |
| | | | | | |
| 2 | AMF Panel | 558000.00 | 617000.00 | 825000.00 | 830000.00 |
| 2 | Civil Foundation for D.G. Set . | 125000.00 | 125000.00 | 125000.00 | 125000.00 |
| | | | | | |
| 3 | Exhaust Piping of 125 mm Dia | 30000.00 | 40000.00 | 40000.00 | 40000.00 |

| Sr. No | Description | 200 KVA | 250 KVA | 320 KVA | 380 KVA |
|---|---|---|---|---|---|
| | M.S. pipe With flanges, bends & Support (One Run) | | | | |
| | | | | | |
| 4 | Transportation | 40000.00 | 50000.00 | 50000.00 | 50000.00 |
| | | | | | |
| 5 | Fuel piping | 25000.00 | 25000.00 | 25000.00 | 25000.00 |
| | | | | | |
| 6 | Insulation of Exhaust piping with 50 mm thickness Glass Wool, Chicken mesh & alluminium Cladding (Including Residential Silencer) | 15000.00 | 22500.00 | 22500.00 | 25000.00 |
| | | | | | |
| 7 | Alluminium armoured Cable Suitable as per KVA of Generators. | 90000.00 | 125000.00 | 150000.00 | 160000.00 |
| | | | | | |
| | | | | | |
| 8 | 12core x 2.5 Sq mm Copper armoured Control with termination. | 15000.00 | 15000.00 | 15000.00 | 15000.00 |
| 9 | Terminations of cable with lugs & glands. | 25000.00 | 25000.00 | 25000.00 | 25000.00 |
| | | | | | |
| 10 | Earthing Stations With 300x300x4mm G.I earth plate. | 70000.00 | 70000.00 | 70000.00 | 70000.00 |
| | | | | | |
| 11 | 25x3mm G.I Strip for earthing | 32500.00 | 32500.00 | 32500.00 | 32500.00 |
| 12 | MS Cable Entry Box Extension for Altermator | 15000.00 | 25000.00 | 25000.00 | 25000.00 |
| | | | | | |
| 13 | Consumables ie Diesel | 82000.00 | 107000.00 | 115000.00 | 122000.00 |
| | | | | | |
| 14 | Battery Charging, Battery Stand. | 6000.00 | 6000.00 | 6000.00 | 6000.00 |
| | | | | | |
| 15 | Commissioning of the D.G Set on available load. | 30000.00 | 30000.00 | 30000.00 | 30000.00 |
| | | | | | |
| 16 | Liasioning Charges for PWD Electrical NOC drawing approval & registration of D.G Set (official fees to you account) | 60000.00 | 65000.00 | 75000.00 | 75000.00 |
| | **Total** | **3992500.00** | **5265500.00** | **6084000.00** | **6755500.00** |

महानगरपालिकेस २५० KVA च्या जनरेटरची आवश्यकता आहे. सदर जनरेटर Cummins कंपनीचा बसवायचा असून त्याकरीता मे. आदित्य इलेक्ट्रिकल्स यांनी दर वाटाघाटीनंतर रू. ४८,०४,२०६/- या रक्कमेची निविदा सादर केलेली आहे. सदर निविदास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मंजुरी देण्यात येत आहे. तसेच ठेकेदारांची वेळोवेळी येणारी देयके प्रदानास मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५५ चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही या विषयाचा गोषवारा दिलेला आहे. परंतु, या विषयाचे जे कोणी अधिकारी असतील त्यांना हजर रहायला सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

सदर विषयाचे संबंधित अधिकारी श्री. दिलीप घेवारे आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही श्री. दिलीप घेवारे यांना बोलवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

हा विषय स्थायी समितीमध्ये घेतलेला होता का? हे समजण्यासाठी तुम्ही या विषयावर चर्चा करावी असे मला वाटते.

**मा. सभापती :-**

आपण हा जो संक्रमण शिबीराचा विषय खास करुन इकडे घेतलेला आहे. ह्या विषयासंबंधी संपूर्ण माहिती महापालिकेच्या नगरसेवक व नगरसेविकांना मिळावी यासाठी हा विषय घेण्यात आलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण मागच्या वेळेला असा विषय घेतलेला होता की, आपण ४९९ फ्लॅट बांधायला द्यायचे आहेत. आपण ती जागा बिल्डरला दिलेली आहे. आपल्याला बिल्डर नव्याने फ्लॅट बांधून देणार आहेत. मग आपणच असे केले तर कसे होईल?

**जयंत पाटील :-**

हे काम महापालिका करु शकत नाही का?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण नव्याने फ्लॅट घेतले तर आपल्याला ४९९ फ्लॅट मिळतील. त्यापेक्षा खाजगी जागा वगैरे असेल आपण त्या जागेत फ्लॅट बांधू शकतो. साहेब, हा विषय महासभेत घेतलेला होता की स्टँडींगला घेतलेला होता. याबद्दल आम्हाला माहिती दिली तर बरे होईल, की हा विषय परस्पर घेतलेला होता ते सांगा.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही हा विषय जो घेतलेला आहे. हा विषय आधी महासभेपुढे घेतलेला होता की, स्टँडींग पुढे मांडलेला होता की, तुम्ही आता हा विषय परस्पर आणलेला आहे याची जरा माहिती द्या.

**जयंत पाटील :-**

हा विषय महासभेला घेतला होता असे मला वाटते.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण बिल्डरला एवढी मोठी जागा देतो.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण बिल्डरला एवढी मोठी जागा देण्यासाठी महापालिका सक्षम नाही का? महापालिकासुद्धा सक्षम आहे असे मला वाटते.

**गजानन भोईर :-**

संपूर्ण किती जागा आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

संपूर्ण किती जागा आहे?

**दिलीप घेवारे :-**

त्या जागेत विकासयोजनेची एकूण चार आरक्षणे आहेत. त्या आरक्षणांचे प्रत्येकी क्षेत्रफळ ४ हेक्टर २३ आर आहे. दुस-याचे ५ हेक्टर ७६ आर आहे. तिस-याचे ७ हेक्टर २६ आर आहे. असे एकूण चार आारक्षणाचा एरीया आहे. जे पहिले ४ हेक्टर २३ आर चे क्षेत्र आहे. ते सोडून बाकीचे तिन्ही सी.आर.झेड. ने बाधित आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

ही जागा ४.२३ हेक्टर म्हणजे एकूण २५ एकर आलेली आहे का?

**दिलीप घेवारे :-**

ही जागा २५ एकर झाली.

**जयंत पाटील :-**

अकरा एकर जागा झाली.

**दिलीप घेवारे :-**

यांच्यामध्ये आपली जागा फक्त ४२,३०० स्क्वेअर फिट आहे. आपण यांच्यामध्ये १६,२३५ स्क्वेअर फिटसाठी सहा परवानग्या दिलेल्या आहेत. त्याच्यामध्ये तीन हेक्टर जागा शिल्लक आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

महापालिकेने सहा परवानग्या किती जागेसाठी दिलेल्या आहेत? ते सांगा.

**दिलीप घेवारे :-**

महापालिकेने १६,२३५ स्क्वेअर फिटसाठी सहा परवानग्या दिलेल्या आहेत.

**जयंत पाटील :-**

आता याच्यामध्ये असा प्रश्न उद्भवलेला आहे की, संक्रमण शिबीरामध्ये ज्या धोकादायक इमारती आहेत किंवा ज्या इमारती पडतील त्या लोकांना ती जागा सोडण्याचा निर्णय स्टँडीगला घेतो की आपण हा विषय महासभेला घेणार आहोत. शिवाय, हा निर्णय कोण घेणार आहे? हे समजणे आवश्यक आहे.

**दिलीप घेवारे :-**

हा निर्णय महासभा घेईल.

**जयंत पाटील :-**

तुम्ही हा विषय महासभेपुढे मांडायला पाहिजे.

**दिलीप घेवारे :-**

या विषयाबाबत सभापती महोदयांनी सांगितले आहे की, आपण ज्या परवानग्या दिलेल्या आहेत त्याची सर्व माहिती गोळा करायला पाहिजे. मग स्थायी समिती मार्फत निर्णय घेतला जाईल. आम्ही स्थायी समितीला टिपणी दिलेली आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही हा विषय अगोदर आणा आणि त्याच्यावर काय धोरण ठरविलेले आहे? ते सांगा.

**दिलीप घेवारे :-**

या ठिकाणी असे धोरण ठरविलेले आहे की, एखाद्या बिल्डिंगला आरक्षणामध्ये......

**जयंत पाटील :-**

साहेब, ते धोरण नाही. एखादी इमारत धोकादायक झाल्यानंतर किंवा पडल्यानंतर त्या लोकांना किती काळासाठी आरक्षण द्यायचे? त्यांची पडलेली इमारत कोण बांधणर? आणि ती लोक त्या ठिकाणी किती वर्ष राहणार?

**गजानन भोईर :-**

त्या जागेवर नक्की काय परिस्थिती आहे?

**जयंत पाटील :-**

तुम्ही खाजगी इमारती देणार? मुंबईमध्ये जेवढी स्वतंत्र संक्रमण शिबीरे बांधुन झालेली आहेत. ती सर्व म्हाडाची आहेत.

**गजानन भोईर :-**

तुम्ही जागेवरिल परिस्थिती बघितली का? त्या ठिकाणी संक्रमण शिबीरे बांधुन झालेली आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

हा निर्णय परस्पर घेतलेला आहे का?

**जयंत पाटील :-**

याबाबतचा निर्णय कोणी घेतला?

**प्रेमनाथ पाटील :-**

मी तेच विचारतो की, स्थायी समितीने निर्णय घेतला की, महासभेने निर्णय घेतला ते सांगा.

**गजानन भोईर :-**

संक्रमण शिबीराच्या जागेचा निर्णय कोणी घेतला? या जागेला कोणी परवानगी दिली?

**दिलीप घेवारे :-**

संक्रमण शिबीराबाबतचा निर्णय महानगरपालिकेने घेतलेला आहे. विकास नियंत्रण नियमावलीमध्ये जी काही तरतुद आहे. आपण ती तरतुद खाजगी विकासकाला देऊन त्याच्याकडून दहा टक्के सनदिका बांधून घ्यायच्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

महापालिकेच्या नियमावलीनुसार आपल्याला एवढा योग्य निर्णय घेण्यापूर्वी हा विषय महासभा किंवा स्थायी समितीला आणणे आवश्यक आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही धोरणात्मक निर्णय घ्यायचा आहे.

**दिलीप घेवारे :-**

सन १९९८ मध्ये ह्या विषयावर सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय झालेला आहे.

**मा. सभापती:-**

हा निर्णय सन १९९८ साली झाला असेल.

**गजानन भोईर :-**

सन १९९८ रोजी नगरपालिका होती.

**प्रेमनाथ पाटील :-**

सन १९९८ रोजी नगरपालिका होती.

**सुर्यकांत भोईर :-**

त्यावेळेला आपल्या ताब्यात जागा नव्हती. परंतु, आपण जागा घेऊन संक्रमण शिबिर बांधू शकतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

ती जागा खाजगी मालकाच्या ताब्यात होती. श्री. घेवारे साहेब, आपला विकास आराखडा कुठंपर्यंत आलेले आहे? ते सांगा. समजा, आपल्याकडे सी.आर.झेड. खाली जागा आहे आणि आपण त्या जागेबाबत परवानगी घेतली.

**दिलीप घेवारे :-**

आपण सी.आर.झेड. कडून परवानगी घेऊ शकत नाही.

**मा. सभापती :-**

समजा, आपली एखादी जागा आहे आणि त्या जागेवर आरक्षण आहे आणि ती जागा त्या बिल्डरची आहे. त्या जागेबाबतचे प्लॅन बिल्डरकडून पास करुन आल्यानंतर बिल्डरने दहा टक्के जागा उपलब्ध करुन द्यावी अशी अट टाकलेली आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, समजा, ४.२३ हेक्टर जागा माझ्या मालकीची आहे. परंतु, माझ्या मालकीची जागा आपल्या महापालिकेने ताब्यात घेतली आणि त्या जागेबाबत टी.डी.आर. दिला. जर आपण त्या जागेवर सदनिका बांधल्या असत्या तर त्या सदनिका जास्त असत्या आणि आपण त्या जास्त सदनिकामध्ये जास्त लोकांना रहायला दिले असते.

**दिलीप घेवारे :-**

आपल्याला जास्त सदनिकांची जास्त किंमत द्यावी लागली असती.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जर आपल्याला जास्त सदनिकांची जास्त किंमत देणे योग्य वाटले असते तर आपण जास्त किंमत दिली असती.

**दिलीप घेवारे :-**

कायद्यामध्ये जी काही तरतुद आहे. तशीच तरतुद ठाणे व मुंबईमध्येसुध्दा आहे. आपल्याकडेच अशी तरतुद आहे अशातला भाग नाही. आपण त्यानुसार दहा टक्के जागेबाबत भरण्याची किंमत रद्द करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. घेवारे साहेब, मिरा भाईंदर महागनरपालिका क्षेत्रामध्ये भरपूर धोकादायक बिल्डींग आहेत. त्या मोठ्या प्रमाणावर आहेत, सध्या धोकादायक बिल्डींगबाबत असलेली समस्या अजुनपर्यंत सुटलेली नाही. या धोकादायक बिल्डींग सर्व नगरसेवकांच्या प्रभागत आहेत. तुम्ही या सर्व लोकांना ८७ सदनिकांमध्ये ॲडजेस्ट करणार आहात का?

**दिलीप घेवारे :-**

आपल्याकडे एकूण १० हेक्टर जागा आहे. त्यापैकी आपल्या दोन जागा आरक्षणामध्ये आहेत. आपल्या एकूण १० हेक्टर जागेपैकी दिड हेक्टर जागेला परवानगी दिलेली आहे आणि आपण उरलेली जागा ॲडजेस्ट करु.

**प्रेमनाथ पाटील :-**

जर आपण त्या उरलेल्या जागांनासुध्दा परवानगी दिली तर.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण उरलेल्या जागेवर परवानगी दिलेली नाही.

**दिलीप घेवारे :-**

नगरपालिकेच्या ठरावांनुसार जागेला परवानगी दिली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

नगरपालिकेने या जागांना परवानगी दिली असती तरी तुम्ही हा विषय महापालिकेच्या महासभेमध्ये किंवा स्थायी समितीमध्ये तो ठराव आणणे आवश्यक आहे.

**जयंत पाटील :-**

श्री. घेवारे साहेब, तुम्ही आम्हाला ठराव वाचून दाखवा आणि त्या ठरावाची तारीखसुध्दा सांगा.

**गजानन भोईर :-**

श्री. घेवारे साहेब, सन १९९८ साली आपल्या नगरपालिकेचे बजेट पास करुन घेतलेले होते. परंतु, या ठिकाणी त्याचा उल्लेख केलेला दिसत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्यावेळेला सी.आर.झेड. नव्हता.

**गजानन भोईर :-**

परंतु, गोषवाऱ्यामध्ये तसा उल्लेख नाही.

**जयंत पाटील :-**

आपला विकास आरखडा कधी मंजुर झाला?

**रतन पाटील :-**

आपला विकास आरखडा सन १९९७ मध्ये मंजुर झालेला होता.

**जयंत पाटील :-**

परंतु, तुम्ही त्या ठिकाणी सन १९९६ बाबत बोलत आहात.

**मा. सभापती :-**

त्यावेळेला सी.आर.झेड. नव्हता. हा मुद्दा महत्वाचा आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, त्यावेळेला धोरण ठरविलेले नव्हते. परंतु, ते धोरण स्थायी समितीने ठरविलेले आहे.

**मा. सभापती :-**

त्यावेळेला सी.आर.झेड. नसला तरी त्यावेळेला जो प्लॅन पास झालेला होता, आपण त्याच्यापेक्षा जास्त घेऊ शकतो. कारण ती त्यावेळेची परमिशन आहे.

**रतन पाटील :-**

आपण जास्त घेऊ शकतो.

**जयंत पाटील :-**

साहेब, तुम्ही या ज्या बिल्डींग बांधणार आहात, तुम्ही त्या बिल्डींग किती लोकांना देणार आहात? किंवा त्या बिल्डींगसाठी काय कन्डीशन्स ठेवलेल्या आहेत ते सांगा.

**गजानन भोईर :-**

तुम्ही याचा अवधी काय ठेवलेला आहे.

**जयंत पाटील :-**

या संक्रमण शिबिराचा अवधी किती आहे? तुम्ही या संक्रमण शिबिराचे भाडे घेणार आहात का? त्याचे पाण्याचे बिल आणि इलेक्ट्रीसिटीचे बिल कोण भरणार? हे सगळे तुम्ही ठरवायचे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

या संक्रमण शिबिरांबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही त्या लोकांना तिथे काय सोयी देणार आहात? ते तुम्ही ठरवायचे आहे.

**गजानन भोईर :-**

संक्रमण शिबिराचा विषय महासभेतून स्थायी समितीमध्ये यायला पाहिजे होता.

**सुर्यकांत भोईर :-**

संक्रमण शिबिराचा विषय महासभेतूनच आणायला पाहिजे होता. संक्रमण शिबिराचा विषय महासभेतसुध्दा मांडलेला नाही आणि स्थायी समितीमध्येसुध्दा मांडलेला नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे साधारणतः २० हेक्टर म्हणजेच जवळपास ५० एकर जागा हाऊसिंग फॉर डिस-हाऊसिंगसाठी महापालिकेच्या मंजुर विकास आराखड्यात आहे. हाऊसिंग फॉर डिस-हाऊसिंग म्हणजे बेघरांसाठी घरे असा तो प्लॅन आहे. महापालिका संक्रमण शिबिरासाठी काय काम करते? याची माहिती होण्यासाठी मा. सभापती साहेबांनी चर्चा केलेली आहे. याच्यामध्ये आपले जे काही डी.सी. रुल्स आहेत किंवा आपण आता नव्याने जे काही डी.सी. रुल्स प्रस्तावित केलेले आहेत. त्याच्यामध्ये ज्या काही तरतुदी होत्या, म्हणजेच महानगरपालिका स्थापन होण्यापूर्वी सन १९९८ मध्ये नगरपालिकेच्या वेळेला जे डी.सी. रुल मंजुर होते. त्या अंतर्गत तत्कालीन प्रशासकीय ॲथोरिटी किंवा प्लॅनिंग ॲथोरिटीने सहा परवानग्या दिलेल्या आहेत. त्याच्यामध्ये साधारणतः दिड हेक्टर एरिया कन्झ्युम झालेला आहे. आपल्याला त्याच्यामध्ये १६.७५ चौ.मी. च्या ९७ सदनिका विना कॉस्ट मिळणार आहेत. हा निर्णय झालेला आहे आणि आपण ज्या सहा परवानग्या दिलेल्या आहेत आपल्याला सर्वसाधारणपणे दोन महिन्यात या सदनिका मिळणार आहेत. त्यांचे डेव्हलपमेन्ट जवळपास पूर्ण झालेले आहे आणि आपल्याकडे याची ओनरशिप राहणार आहे.

**जयंत पाटील :-**

तुमच्या म्हणण्याप्रमाणे हाऊस फॉर डिस-हाऊस म्हणजे ज्यांना घरे नाहीत त्यांना घरे द्यायची. म्हणजे याच्यामध्ये संक्रमण शिबिर हा वेगळा भाग झाला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही म्हणता ते बरोबर आहे.

**जयंत पाटील :-**

दोन्ही वेगवेगळे भाग आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपल्या महापालिकेला ९७ सदनिका त्यांच्याकडून हस्तांतरीत झाल्यानंतर महापालिकेला ही घरे बेघरांना वाटप करायची आहेत की, संक्रमण शिबिर म्हणून वापरायची आहेत यावर महासभा धोरणात्मक निर्णय घेईल.

**जयंत पाटील :-**

याचा अर्थ अजुन काहीही ठरलेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

याच्यावर नंतर निर्णय होईल. उर्वरित जी काही २० हेक्टर जागा आहे. आपण त्या जागेसाठी सन्मा. सदस्य बोलल्याप्रमाणे संक्रमण शिबिरासाठी हस्तांतरित करुन घेऊ शकतो. सध्या ते रिझर्वेशन परवानगी दिल्यानंतर कायम आहे. अजुनपर्यंत त्या ठिकाणी कुठलाही विकास झालेला नाही अशा जागा आहेत. आपल्याला त्या जागा निगोसिएशन करुन किंवा ॲक्विझीशन करुन घेता येतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही आता बोललात की, जे आधी झाले ते ठिक आहे. परंतु, आता जे उरलेले रिझर्वेशन आहे. आपण ते ताब्यात घेऊन आपण संपूर्ण सदनिका संक्रमण शिबिराची बांधु शकतो. तुम्ही सेम प्रोसिजर त्यावेळेला का युज केली नाही? तुम्ही त्यावेळेला महासभा स्थायी समिती किंवा महापालिकेची परवानगी का घेतली नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

डी.सी. रुल्सच्या तरतुदीच्या अधीन राहून ते केलेले आहे. आपण रिझर्वेशन डेव्हलपमेन्टसाठी जी डी.सी. रुलमध्ये तरतुद केलेली होती. त्या तरतुदीला महासभेची मान्यता असते. शासनाकडे अंतिम मान्यता होते.

**जयंत पाटील :-**

संक्रमण शिबिराचा हा धोरणात्मक निर्णय आहे आणि रिझर्वेशन हा एक वेगळा प्रकार आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

त्यावेळेच्या प्लॅनिंग ॲथोरिटी किंवा संबंधित महासभेने हा विषय आणायला पाहिजे होता.

**जयंत पाटील :-**

आपण आता या विषयावर कार्यवाही करु शकतो.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही हा विषय आता का घेत नाही?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यावेळेच्या नगरपालिकेने परवानगी दिलेली होती आणि आपल्याकडे त्यावेळेच्या ठराव उपलब्ध आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

नगरपालिकेचा ठराव होता. मग तुम्ही त्यावेळेला संक्रमण शिबिर का बांधले नव्हते?

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, मा. सर्वसाधारण सभा दि. २५/६/१९९८ रोजी एक ठराव केलेला होता. मा. नियोजन व विकास समिती दि. ०३/०४/१९९८ च्या सभेने शिफारस केलेल्या ठरावावर निर्णय घेणे. त्यांनी सर्वसाधारण सभेला शिफारस केलेली होती. सर्वसाधारण सभेचा ठराव आहे. फक्त महासभेला शिफारस केलेली आहे. (ठरावाचे वाचन केले.) आता याच्यामध्ये ठरावाच्या अनुषंगाने द्यायचे ठरवलेले आहे. आपल्याला त्यानुसार नगररचनाने परवानगी दिलेली आहे. परंतु, आपल्याकडे सन १९९८ मध्ये सी.आर.झेड. नव्हता. आपल्याकडे असेलेली आरक्षणे सी.आर.झेड.मुळे बाधीत झालेली होती. ती आरक्षणे बाधीत झाल्यानंतर आपल्या शहराला जास्त प्रमाणात आवश्यकता भासू लागली. मग अशावेळेला आपण त्या नियमाच्या अनुषंगाने त्यांना परवानगी दिली किंवा आपण या नियमाच्या अनुषंगानेच २००० ते ३००० बेघर लोकांना जी काही घरे द्यायची आहेत. आपण त्यानुसार ह्या नियमाच्या विषयावर महासभेमध्ये आरोप करायला पाहिजे होता. परंतु, आपण तो केला नाही. आज आपल्याला याची आवश्यकता का भासली? कारण सी.आर.झेड. बाधित झाल्या कारणामुळे आपण ते आरक्षण देऊ शकत नाही. जर आपल्याकडे बेघरांना घरे देण्याबाबतचे आरक्षण होते. त्या आरक्षणामधील काही आरक्षणे सी.आर.झेड. मुळे बाधित झालेली आहेत. उरलेली कमी प्रमाणीत जागा होती. आपल्याकडे त्या विकासाकर्त्याने जेवढ्या जागेची मागणी केलेली आहे. तेवढी जागा द्यायची आहे. आपण अशा पद्धतीने त्यांना आरक्षण दिले. आपण असे आरक्षण देताना महासभेला किमान असे लक्षात आणून द्यायला पाहिजे होते. कारण आपल्याला आता जागेची आवश्यकता आहे. जर सी.आर.झेड. नसता तर आपल्याकडे शेकडो एकर जागा होती. आपण ती जागा संपूर्णपणे विकासकर्त्याला दिली असती तर आपल्याकडे तेवढे फ्लॅट हस्तांतरित झाले असते आणि आपल्या शहरामध्ये ज्या काही मोठ्या इमारती आहेत. आपण त्यांना संक्रमण शिबारामार्फत फ्लॅट देऊ शकलो असतो. परंतु, आज ती जागा सी.आर.झेड. ने बाधित असल्या कारणाने आपल्याला जास्त आवश्यकता आहे. आणि आपले रिर्झवेशनही कमी प्रमाणात आहे. आज मिरा-भाईंदर महानगरपालिकेने ज्या पद्धतीने स्वतःहून खर्च करुन पाण्याच्या नवीन

योजनेची उभारणी केली. आपण रु. ३२ कोटीचा कर्ज उभारणी करून रस्ता बांधला. आपल्याकडे फ्लाय ओव्हर ब्रीज नव्हता. आपण तो फ्लाय ओव्हर ब्रीजसुद्धा कर्ज उभारणी करुन बांधलेला आहे. आपल्या जागेची जी काही आरक्षणे आहेत. आपण ती आरक्षणे संपूर्णपणे विकसित करू शकलो असतो. जर उद्या छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर एक बिल्डिंग पडून एक माणूस ताबडतोब मृत्यूमुखी पडलेला होता आणि ते आपल्या अंगाशी आले. जर तुम्ही उद्या धोकादायक इमारतींना नोटीसा दिल्या नाहीत आणि ती बिल्डिंग कोसळल्यावर त्या ठिकाणी आपले इंजिनियर किंवा तज्ञ गेले आणि त्यांनी ही बिल्डिंग धोकादायक आहेत आणि ज्या बिल्डिंग धोकादायक असल्याचे सांगितले तर प्राथमिक दिसणाऱ्या बिल्डिंग धोकादायक आहेत आणि ज्या बिल्डिंग धोकादायक दिसून येत नाहीत. जर आपण अशा बिल्डिंगची संख्या लक्षात घेतली तर आपल्याला त्या संख्येद्वारे २००० फ्लॅट हस्तांतरित करावे लागतील. मग जर आपण ९४ फ्लॅट दिले तर आपण ते फ्लॅट देताना विचार करायला पाहिजे की, विकासकर्त्याने सद्य परिस्थितीमध्ये किती काम केलेले आहे? ते बघून मुआयना करा. आणि आपण ते काम ताब्यात घेऊ शकतो का? ते बघा. तुम्ही त्यानुसार त्या विकासकर्त्याला किंवा बिल्डरला बोलावून घ्या. त्या बांधकामाची पाहणी करण्यासाठी तुमचे अधिकारी ठेवा आणि किती बांधकाम पूर्ण झाले, किती बांधकाम शिल्लक आहे ते बघा आणि त्याच्यावर निर्णय घ्या. आज हा प्रश्न निर्माण झालेला आहे. जर आपण रेल्वेमधील बॉम्बस्फोट बघितला तर या बॉम्बस्फोटामध्ये शेकडो लोक मरण पावलेली आहेत. समजा, आपल्या क्षेत्रातील एखादी इमारत कोसळल्यानंतर जी काही माणसं मेली. त्यामुळे आपल्या शहराला काळीमा लागू शकतो. तो नगरपालिकेचा निर्णय होता हे मला मान्य आहे. परंतु, नगरपालिका असताना त्यावेळची लोकसंख्या कमी होती. परंतु, आता लोकसंख्या वाढलेली आहे. आपल्याकडे नगरपालिका असताना धोकादायक इमारतीचे प्रमाण कमी होते. परंतु, आता धोकादायक इमारतीचे प्रमाण वाढलेले आहे. आपण अशा पद्धतीचा विचार करुन निर्णय होणे आवश्यक आहे आणि फेरविचार होणे आवश्यक आहे. मी या ठिकाणी अशा पद्धतीचे मत मांडू इच्छितो. तसेच, नगररचना विभागचे अधिकारी श्री. दिलीप घेवारे यांना विचारु इच्छितो की, आपण याच्यामध्ये फेरविचार करु शकतो का? आपल्याला बेघरांसाठी एवढी घरे बांधायची आहेत. आपल्याकडे रिझर्वेशनचेसुध्दा काम आहे. त्या रिझर्वेशनसाठी उपलब्ध असणारी जागा आणि सी.आर.झेड. बाधित होणारी जागा ही केवढी आहे? याबाबत तुम्ही आम्हाला माहिती दिली तर बरे होईल.

**दिलीप घेवारे :-**

आपल्याला सी.आर.झेड. वगळून साडे सहा हेक्टर जागा मिळू शकते.

**मोहन पाटील :-**

त्याच्यामध्ये किती टक्के आरक्षण आहे?

**दिलीप घेवारे :-**

याच्यामध्ये एकूण चार आरक्षणे आहेत.

**मोहन पाटील :-**

ही किती हेक्टर जागा आहे?

**दिलीप घेवारे :-**

आपल्याकडे एकूण चार आरक्षणे आहेत आणि जागेचा एरिया २० हेक्टर आहे.

**मोहन पाटील :-**

या जागेचा एकूण २० हेक्टर एरिया आहे. मग उरलेला एरिया किती आहे?

**दिलीप घेवारे :-**

उरलेला एरिया १३ हेक्टर आहे.

**मोहन पाटील :-**

याचा अर्थ २० हेक्टर जागेमधून १३ हेक्टर जागा बाधित झालेली आहे आणि ७ हेक्टर जागा उरलेली आहे.

**दिलीप घेवारे :-**

आपण ७ हेक्टर जागेमधून दिड हेक्टर जागेची परवानगी घेतलेली आहे.

**मोहन पाटील :-**

साहेब, मला या ठिकाणी एवढेच म्हणायचे आहे की, ७ हेक्टर जागा देण्यासाठी नगरपालिका किंवा नगरपरिषद सक्षम होती. परंतु, मिरा भाईंदर महानगरपालिकासुध्दा सक्षम आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी अशाप्रकारचे रिझर्वेशन असतील आपण त्या ठिकाणी त्यावेळेला विरोध केला पाहिजे. आपण विरोध का केला पाहिजे? कारण आपल्याकडे एवढ्या इमारती धोकादायक असतील तर आपण त्याचा सर्व्हे रिपोर्ट मागितला पाहिजे. आपण त्याची माहिती मागितली पाहिजे आणि तो सर्व्हे रिपोर्ट ॲव्हलेबल करु दिला पाहिजे. आपण अपला छत्रपती शिवाजी महाराज मार्ग हा रस्ता रु. ३२ कोटीमध्ये बांधला. आपण हा रस्ता छत्रपती शिवाजी महाराज मार्ग काशिमीरा ते उड्डाणणपुलापर्यंत बांधला. आम्ही त्यावेळेला एम.एम.आर.डी.ए. कडे लोनसाठी अपिल केलेले होते. परंतु, आम्हाला एम.एम.आर.डी.ए. ने लोन दिला नाही. म्हणून आम्ही स्वतःच्या फंडातुन त्याचा प्रस्ताव केलेला होता. जर आम्ही उद्या एम.एम.आर.डी.ए. कडून एवढे एवढे लोन मिळायला पाहिजे. जेणेकरुन आम्ही बेघरांसाठी घरे बांधू शकतो. जर आपल्याला त्यांनी पैसे दिले नाही तर आपण स्वतः रु. ४०

कोटी ते ५० कोटी भरु शकतो आणि लोकांना घरे देऊ शकतो. मी मांडलेले म्हणणे आणि तुम्ही जे म्हणणे मांडता त्याच्यामध्ये काय तफावत आहे? ती बघा आणि आपल्याला त्याच्यामध्ये प्रोव्हीजन करता येईल की नाही. आपण यासाठी प्रयत्न केला पाहिजे की नाही केला पाहिजे. याची मला माहिती द्या.

**दिलीप घेवारे :-**

आता जो साडे पाच हेक्टर एरिया आहे. आपण त्या एरियामधील सर्व परवानग्या भू-संपादन कायद्यानुसार किंवा टी.डी.आर. नुसार संपादन करुन आपण बांधू शकतो. दुसरी गोष्ट अशी आहे की आपल्याकडे जो सी.आर.झेड. आहे त्याचा अर्धा भाग झालेला आहे. त्याबाबत बँकेच्या सर्व परवानग्या देण्याबाबत आहे. आपण या सर्व परवानग्या गव्हर्नमेंटला देऊन आपण सी. आर. झेड. शिथिल करण्यासाठी लोन मिळू शकतो. आता सन्माननिय सदस्य जयंत पाटील बोलल्याप्रमाणे संक्रमण शिबिर आणि बेघरांसाठी घरे हे दोन वेगवगळे विषय आहेत. ही जी आरक्षणे आहेत आपण ही आरक्षणे विकास योजनेत रस्ता बाधित होणाऱ्या लोकांसाठी वापरायचा आहे. म्हणजे रस्ता रुंदीकरणमध्ये बाधित होणरी जागा असेल तर त्यासाठी ही आरक्षणे वापरायची आहेत. परंतु, आपला विषय धोकादायक बिल्डिंग पडल्यानंतर जी कार्यवाही करायची आहे त्याबाबतचा आहे. त्याच्या पूर्वी काय झालेले होते? हा एक वेगळा मुद्दा आहे. आपल्याला संक्रमण शिबिरांसाठी वेगळी जागा पाहिजे हे सुद्धा तितकेच खरे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

श्री. घेवारे साहेब, ह्या हेक्टरमध्ये अंदाजे एकूण खर्च किती झाला असेल? ते सांगा.

**दिलीप घेवारे :-**

याच्यासाठी एकूण रु. ५५ हजार खर्च झाला असेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या बिल्डरने सन १९९७ मध्ये त्या सदनिका बांधलेल्या आहेत ना.

**दिलीप घेवारे :-**

तो बिल्डर सन २००० पासुन सदनिका बांधत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

एखादी बिल्डिंग किंवा एखादे टॉवर एक ते दिड वर्षामध्ये बांधून पूर्ण होते आणि तो विकासकर्ता अजुनपर्यंत बिल्डिंग बांधतो हे योग्य नाही.

**गजानन भोईर :-**

आता आपल्या ताब्यात किती सदनिका दिलेल्या आहेत?

**दिलीप घेवारे :-**

आता आपल्या ताब्यात एकूण ९७ सदनिका आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

सदनिकांचे काम सन २००० पासून चालू आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही त्या विकासकर्त्याचे काम थांबवा. महापालिका त्या विकासकर्त्याचे पेमेंट देईल. महापालिका विकासकर्त्याचे पेमेंट करण्यासाठी सक्षम आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा‍ो. ) :-**

आता या विकासकर्त्याचे काम पूर्ण होत आलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या विकासकर्त्याने बिल्डिंग बांधलेली आहे की चाळ सिस्टिम रुम बांधलेले आहेत ते सांगा.

**दिलीप घेवारे :-**

त्या बिल्डरने बिल्डिंग बांधलेल्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

बिल्डिंग बांधलेली आहे की टॉवर बांधलेले आहेत

**दिलीप घेवारे :-**

टॉवर बांधलेले आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा‍ो. ) :-**

टॉवर बांधलेले आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

त्या बिल्डरचे नाव काय?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण जागा बिल्डरच्या ताब्यात दिली तर तो बिल्डर कुठला आहे? ते तुम्हाला माहिती पाहिजे.

**दिलीप घेवारे :-**

मला बॉम्बे आर्किटेक्टचे नाव माहिती आहे.

**जयंत पाटील :-**

सध्या हे बांधकाम कुठल्या सर्व्हे नंबरमध्ये चालू आहे? ते सांगा.

**दिलीप घेवारे :-**

सध्या सर्व्हे नंबर १९३, सर्व्हे नंबर २२, सर्व्हे नंबर २७, सर्व्हे नंबर २८, सर्व्हे नंबर १९२ आणि सर्व्हे नंबर १९४ मध्ये काम चालू आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, सर्व्हे नंबर १९३ हा नवघरचा आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही सर्व्हे नंबर १९३ या नवीन सर्व्हे नंबरबाबत बोलत आहात की जुन्या बाबत बोलता ते सांगा.

**जयंत पाटील :-**

तुम्ही सर्व्हे नंबर १९३ नवीनबाबत की जुन्या बाबत बोलता ते सांगा.

**दिलीप घेवारे :-**

मी सर्व्हे नंबर १९३ नवीनबाबत बोलत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. घेवारे साहेब, तुमचा नगरपालिकेचा जो ठराव आहे तो आरक्षण क्र. २२२, मौजे-नवघर बेघरांसाठी घरे असा आहे. या ठरावामध्ये मे. अरिहन्त कन्स्ट्रक्शन कंपनीने इमारत बांधण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. तुम्ही नगरपरिषद आणि महासभेची परमिशन घेऊन त्यांना परवानगी दिलेली आहे. तुम्ही तसे पत्र इतर बिल्डरना दिले तर त्यावेळेला महासभेची परवानगी का घेतलेली नव्हती?

**दिलीप घेवारे :-**

एकदा आरक्षण डेव्हलप करण्यासाठी परमिशन दिल्यानंतर पुन्हा-पुन्हा परमिशन घेण्याची आवश्यकता नसते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही त्यांना परमिशन दिलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मिरा भाईंदरमध्ये एका बिल्डरला बिल्डिंग बांधण्यासाठी परमिशन दिल्यानंतर दुसरा बिल्डर बिल्डिंग बांधू शकत नाही असा त्याचा अर्थ झाला.

**सुर्यकांत भोईर :-**

एकदा एखादा प्लान पास झाल्यानंतर तुंम्हाला रिव्हाईस प्लान लागतो ना.

**दिलीप घेवारे :-**

आपण विकास नियंत्रण नियमावलीखाली एक प्लॅन तयार करायचा आहे. त्यानुसार आरक्षण डेव्हलपमेंटसाठी दिले. आपल्याला फक्त एक केस हवी होती.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण याच्यामध्ये असे लिहिलेले आहे की, तसेच नगरपरिषदेकडे आरक्षण विकसित करण्यासंबंधी प्राप्त होणा-या प्रस्तावास मंजुरी देण्याचे अधिकार खालील समितीस देण्यात येत आहेत. नगराध्यक्ष, सभापती, नियोजित विकास समिती आणि स्थायी समिती असा या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. मग जर तुम्ही या ठिकाणी हे आरक्षण घेतलेले असेल तर तुम्ही त्यावेळेला या सर्वजणांकडे परमिशन का मागितली नाही? ते सांगा.

**दिलीप घेवारे :-**

आपण आरक्षणाबाबत महासभेने ठराव केलेला आहे. आपण त्याच्यामध्ये हॉस्पिटल, गार्डन, प्ले-ग्राउंड यांची प्राथमिक यादी तयार केलेली आहे आणि त्याचे सर्व अधिकार मा. आयुक्तांना दिलेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते डेव्हलप असलेले आरक्षण वेगळे आहेत. परंतू, आपण हे आरक्षण एका खाजगी बिल्डरला दिलेले आहे.

**दिलीप घेवारे :-**

आपली सरकारी जागेवर असणारी आरक्षणे फार कमी आहेत. आपली बहुतेक सर्व आरक्षणे खाजगी जागेवरच आहेत. आपल्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आरक्षणची तरतुद असेल तर आपण काही भाग बांधून देउ आणि उरलेली पडून राहील.

**प्रभात पाटील :-**

परंतु, तो भाग विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दोन्ही प्रोव्हीजन वेगवेगळया आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

सेंट झेवियर्स स्कुलचे नाव दिलेले आहे. त्याचे काय करायचे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो वेगळा विषय आहे आणि हा वेगळा विषय आहे. या ठिकाणी दोन वेगवेगळी आरक्षणे डेव्हलप करण्यासाठी मागितलेली आहेत. त्याच्यापैकी एक आरक्षण सेंट झेवियर्स स्कुलसाठी मागितलेले आहे.

**मा. सभापती :-**

आपण संक्रमण शिबिराच्या विषयाबाबत लंचनंतर माहिती घेउन आढावा घेउया.

(जेवणाची वेळ दुपारी २.०० ते ३.४५)

**मा. सभापती :-**

सभेला सुरुवात करण्यात यावी.

**एस. ए. खान :-**

गोषवा-यामध्ये जी आरक्षणे दाखवण्यात आलेली आहेत ती नवघर सर्व्हे नंबर १९८, सर्व्हे नंबर २२२, सर्व्हे नंबर २२७ पैकी सी.आर.झेड. खजगीमध्ये घेतला जाईल का?

**दिलीप घेवारे :-**

सी.आर.झेड. खजगीमध्ये घेतला जाईल.

**एस. ए. खान :-**

दुस-या नवघरच्या सर्व्हे नंबरचा सी.आर.झेड. ७० टक्के आहे. याचा अर्थ काय आहे?

**दिलीप घेवारे :-**

संपूर्ण जमिनीमध्ये ७० टक्के जागा सी.आर.झेड.ने बाधित आहे. असा त्याचा अर्थ झाला.

**गजानन भोईर :-**

परंतु, आता फक्त सर्व्हे नंबर २२२ मध्येच काम चालू आहे का?

**एस. ए. खान :-**

मग त्याच्यामध्ये काय फायदा आहे?

**गजानन भोईर :-**

आरक्षण क्र. २२२ मधील काम पूर्ण झालेले नाही. त्याठिकाणी अजूनपर्यंत काम चालू आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्हाला ९७ सदनिका हव्या आहेत ना.

**एस. ए. खान :-**

सदनिका बांधून पूर्ण तयार आहेत का?

**दिलीप घेवारे :-**

सर्व सदनिका तयार आहेत.

**एस. ए. खान :-**

त्या सदनिका हँड ओव्हर झालेल्या आहेत का?

**दिलीप घेवारे :-**

आम्ही दोन महिन्यामध्ये सर्व सदनिका बांधून पुर्ण करु. ऑगस्ट ते सप्टेंबरचा कालावधी लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, माझ्याकडे एक पत्र आहे. शिवाय या ज्या सर्व परवानग्या आहेत त्या सर्व परवानग्या सन २००५ ते सन २००६ म्हणजेच गेल्या वर्षी साधारणपणे ऑक्टोबर महिन्यामध्ये दिलेल्या आहेत. आणि जास्तीत जास्त परवानग्या गुजरात प्रॉपर्टीला दिलेल्या आहेत. म्हणजे एकच मालक आहे. बाकीचे दुसरे श्री. संजय जैन आणि श्री. हसमुख पटेल हे दोघे मालक आहेत.

**प्रभात पाटील :-**

तशा परवानग्या तुमच्याकडे दिलेल्या आहेत. आमच्याकडे तशा परवानग्या दिलेल्या नाहीत.

**गजानन भोईर :-**

तो नगरपालिकेचा ठराव आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो नगरपालिकेचा ठराव नसुन नगरपालिकेने माहिती दिलेली आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार हाऊसिंग फॉर डिस-हाउसिंग विकसित करण्यासाठी समुचित प्राधीकरण महानगरपालिका, म्हणजे मिरा-भाईंदर महानगरपालिका पब्लिक, सेमी पब्लिक आणि मालक स्वतः विकत घेऊ शकतात. म्हणजे याच्यामध्ये सगळ्यांना राईटस दिलेले आहेत इन्डिव्हीज्युअल मला आणि प्रत्येकाला राईटस दिलेले आहेत. याबाबत माझे असे मत आहे की, आपण त्या बिल्डरला फायदा करुन देण्यापेक्षा आपण ती जागा स्वतः घेतली असता किंवा मिरा-भाईंदर महानगरपालिकेने घेतली असती आणि जर विकासित केली तर आपल्याला याच्यापेक्षा डबल फायदा झाला असता आणि जास्तीत जास्त लोकांना याचे बेनिफिट मिळाले असते. शिवाय आपली एक ॲसेट निर्माण झाली असती. दुसरी गोष्ट अशी आहे की आर्यन बिल्डरला ज्याप्रमाणे नगरपरिषद असताना नगरपरिषदेच्या महासभेमध्ये ठराव पास केला आणि आर्यन बिल्डरला परवानगी दिली. आणि ठराव पास करताना असेही म्हटलेले आहे की, यापुढे जर आरक्षण

विकसित करायचे असेल तर नगरपालिकेच्या नगराध्यक्षाला व स्थायी समितीच्या सभापतींना स्थायी समितीच्या सभेला राईटस दिलेले आहेत. त्याप्रमाणे आपणही परवानगी देताना स्थायी समितीला किंवा महासभेला विचारले तर बरे झाले असते.

**दिलीप घेवारे :-**

हा धोरणात्मक निर्णय आहे. महासभा किंवा स्थायी समिती धोरणात्मक निर्णय घेत असते. आरक्षण विकासाला परवानगी दिलेली आहे. आपण छत्रपती महाराज मार्ग ते उड्डाणपुलापर्यंत च्या रस्त्याला परवानगी दिली. तिथे दहा ठेकेदार असले तर आपण प्रत्येकाला परवानगी देत नाही. फक्त रस्त्याच्या कामाला परवानगी दिली जाते.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, तुम्ही असे कसे बोलला? जर दहा ठेकेदार रस्त्याचे काम करत असले तरी एकच परवानगी द्यावी लागते. तम्हाला सर्व कॉन्ट्रक्टरचा विचार करावा लागेल. हा कॉन्ट्रक्टर किती कॅपेबल आहे? तो काय करु शकतो की नाही हे सुद्धा बघावे लागेल.

**दिलीप घेवारे :-**

एकदा रस्त्याच्या कामाला आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळाल्यानंतर पुन्हा ते काम ताबडतोब होऊन जाईल. आपण त्यानुसार आरक्षण असतील त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल. त्यासाठी प्रत्येक वेळेला हा विषय महासभेसमोर आणायची गरज नाही. आपण आताच्या नवीन डी.सी. रुलप्रमाणे ते अधिकार आयुक्तांना दिलेले आहेत.

**जयंत पाटील :-**

पूर्वी नगराध्यक्ष होते, आता आयुक्त झालेले आहेत. तुम्ही प्रथम आयुक्तांची परवानगी आहे का? ते बघून घ्या.

**दिलीप घेवारे :-**

ते सगळे प्लॅन आयुक्त मंजुर करतात. प्रत्येक गोष्टीला अंतिम मंजुरी आयुक्तांची असते. त्यासाठी भोगवटा दाखला वगैरे दाखल्यांची वगैरे असते.

**प्रेमनाथ पाटील :-**

जर आपल्या आयुक्तांनी यांना परवानगी दिली असेल तर आपल्या आयुक्तांना मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात किती धोकादायक इमारती आहेत? आणि त्या कधीही कोसळू शकतात हे माहिती नाही का? आपण या बिल्डींग बांधून जो कोणी खाजगी मालक असेल तर त्यांना पेमेन्ट करुया. सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब यांनी कर्ज घेऊन रस्ते बनविल्याचे सांगितले.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण अकरा डी.पी. रोड बनविताना कर्ज घेतले. आता आपण त्या कर्जाच्या माध्यमातुन डेव्हलपमेन्टचे काम करित आहोत. आपण हेसुध्दा कर्ज घेऊनच करुया. आपण दुसऱ्या विकासकाला देण्यापेक्षा आपण हे काम कर्ज घेऊन केले असते तर चालले असते.

**प्रेमनाथ पाटील :-**

आमचा या गोष्टीला विरोध आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही ज्या विकासकाला काम दिलेले आहे. आमचा त्याला काम देण्याबाबत विरोध आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मला विकासकर्त्याचे नांव माहित नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

ह्यांना विकासकर्त्यांचे नांव माहित नसल्यामुळे तुम्ही त्या विकासकर्त्याला या ठिकाणी बोलवा. तो विकासकर्ता येईपर्यंत मिटींग थांबवून ठेवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

संबंधित विकासकर्त्याचे काम चालू आहे. म्हणून तो विकासकर्ता येऊ शकत नाही. त्या विकासकर्त्याची परवानगी रद्द करा.

**सुर्यकांत भोईर :-**

संबंधित विकासकर्त्याचे काम थांबवा.

**मा. सभापती :-**

आपल्याला सध्या विकासकर्त्याची गरज आहे. त्यामुळे आपल्याला त्या विकासकर्त्याचे काम स्टॉप करता येणार नाही.

**गजानन भोईर :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही या सदनिका कोणाला देणार आहात? याचे मला स्पष्टीकरण द्या.

**मा. सभापती :-**

आपल्याला या सदनिका कोणाला द्यायच्या ते ठरविलेले नसल्यामुळे आपण त्याचा विचार नंतर करुया.

**प्रभात पाटील :-**

त्या सदनिकांमध्ये कोणी जाऊन घुसु नये याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

**दिलीप घेवारे :-**

आपल्याकडे त्या सर्व सदनिकांच्या चाव्या राहतील.

**गजानन भोईर :-**

तुम्ही या सदनिका बेघरांसाठी देणार की, ज्या इमारती धोकादायक झालेल्या आहेत. तेथील लोकांचे स्थलांतर तिथे करणार आहात का?

**दिलीप घेवारे :-**

जी लोक विकास योजनेतील प्रस्तावाने बाधीत झालेले आहेत. आपण जो रस्ता करताना त्याच्यामध्ये ज्या लोकांची घरे गेलेली आहेत किंवा आरक्षणे गेलेली आहेत त्या लोकांसाठी या सदनिका उभारायच्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

हा प्रस्ताव वाल्मीकी आंबेडकर आवास योजनासारखा आहे असा याचा अर्थ झाला.

**दिलीप घेवारे :-**

या ठिकाणी बेघरांसाठी घरे हा शब्दप्रयोग करणे योग्य आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण आता ज्या सदनिका तयार करणार आहोत. त्या संक्रमण शिबिर म्हणून देणार आहोत की, रस्त्यामध्ये ज्या लोकांची घरे गेलेली आहेत त्यांना या सदनिका देणार ते प्रथम क्लिअर करा. कारण रस्ता रुंदीकरण करताना ज्या लोकांची घरे गेलेली आहेत त्यांना या सदनिका द्यायच्या आहेत असे श्री. दिलीप घेवारे साहेबांचे म्हणणे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

ज्या लोकांची रस्त्यामध्ये घरे गेलेली आहेत त्यांना घरे द्यायची आहेत असे श्री. दिलीप घेवारे साहेबांचे म्हणणे आहे.

**गजानन भोईर :-**

आपण या सदनिका कायमस्वरुपी द्यायच्या आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या अनुमतीने मी या ठिकाणी स्पष्टीकरण करतो की, त्या ज्या ९७ सदनिका आहेत. या ९७ सदनिका महापालिकेच्या मालकी हक्काच्या राहतील आणि त्यांचा वापर कसा करायचा हे महापालिका निश्चित करेल.

**दिलीप घेवारे :-**

आपण ते सर्व काही निश्चित केलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण सदनिकाचा वापर कोणी व कसा करायचा? हे निश्चित केलेले नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

आता श्री. दिलीप घेवारे साहेब बोलले की, रस्ता रुंदीकरणामध्ये ज्यांची घरे बाधीत होतील त्यांनाच सदनिका दिल्या जातील. परंतु, अजुनपर्यंत तसे झालेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

रस्ता रुंदीकरणाने बाधीत होणाऱ्या घरांसाठी ती रिझर्वेशन आहेत. रिझर्वेशनमुळे बाधीत होणारे जे कोणी नागरिक असतील आपण त्यांच्यासाठी या शिबिराचा वापर करायचा आहे.

**दिलीप घेवारे :-**

याचे धोरण काय ठरवायचे आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

या रिझर्वेशनचे धोरण ठरविण्याचा अधिकार महासभेला आहे आणि त्या ९७ सदनिका महापालिकेच्या मालकीच्या राहतील.

**जयंत पाटील :-**

तुम्ही गुजरात एन्टरप्राईजला का दिलेले आहे?

**मा. सभापती :-**

ती जमीन गुजरात एन्टरप्राईजसने विकत घेतलेली आहे.

**गजानन भोईर :-**

या सदनिका महापालिकेच्या ताब्यात राहतील?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

हे आपणच अंतिम करतो ना.

**दिपक खांबित :-**

होय.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण सन २००५ मध्ये सदनिका बनविण्यासाठी परवानगी दिलेली होती.

**गजानन भोईर :-**

आपण सन १९९८ साली सदनिका बांधण्यासाठी परवानगी दिलेली होती आणि सन २००० मध्ये सदनिकांचे बांधकाम सुरु झालेले होते.

**सुर्यकांत भोईर :-**

कामाला सन २००५ मध्ये परवानगी दिलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

एक म्हणतो की, सन २००५ मध्ये परवानगी दिलेली आहे आणि एक बोलतो की, सन २००० मध्ये काम चालू केलेले आहे.

**दिलीप घेवारे :-**

पहिली परवानगी सन २००० ची आहे. मी पहिल्यांदा ही एन.ओ.सी. देतो. परंतु, एन.ए. किंवा एन.ओ.सी. केल्यानंतर आपण त्यांना सी.सी. देतो आणि या ज्या तारखा आहेत त्या सी.सी.च्या आहेत. या सर्व परवानग्या आधीच पास केलेल्या असतात.

**जयंत पाटील :-**

माझ्या माहितीप्रमाणे गुजरात एन्टरप्राईजेसने ती जागा सन २००० मध्ये विकत घेतलेली आहे. जर ती जागा गुजरात एन्टरप्राईजेसने सन २००० मध्ये विकत घेतलेली घेतली असेल तर त्याचे ॲग्रीमेन्ट दाखवा. त्याने ती जागा गेल्यावर्षी विकत घेतलेली होती.

**गजानन भोईर :-**

मग त्या जागेवर आरक्षण कधी पडले?

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याने ती जागा सन २००५ मध्ये विकत घेतलेली होती.

**जयंत पाटील :-**

तुम्ही बोलता की, सन २००० पासून त्याला परवानगी दिलेली आहे. परंतु, त्याने ती जागा सन २००५ मध्ये विकत घेतलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ते काम करण्यासाठी पाच वर्षाचा कालावधी लागू शकत नाही.

**जयंत पाटील :-**

ते आमच्या गावातील शेतकरी आहेत. सन २००० मध्ये तो शेतकरी माझ्या ऑफिसच्या समोर एका गल्लीमध्ये बिल्डींग बांधत होता.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही हा विषय पेन्डीग ठेवा आणि हा विषय पुढच्या स्थायी समितीमध्ये घ्या.

**रतन पाटील :-**

तुम्ही हा विषय पेन्डीग ठेवा.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही पुढच्या वेळेला सर्व कागदपत्रांसह त्या विकासकर्त्याला बोलवा.

**रतन पाटील** :-

सगळे कागदपत्रं म्हणजे जागेच्या मालकीच्या कागदपत्रांसहीत त्या विकासकर्त्याला बोलवा. तोपर्यंत हा विषय पेन्डीग ठेवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा‍ो.) :-**

याच्यामध्ये प्लॅनिंग ॲथोरिटी म्हणून मा. आयुक्तांनी नगररचना विभागाने मंजुर डी.सी. रुल खाली परवानग्या दिलेल्या आहेत. त्याच्यामध्ये त्यांचा दहा टक्के बिल्ट-अप कन्स्ट्रक्शनचा एरिया महापालिकेला रिझ्युम होणार आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, दहा टक्केपेक्षा जास्त वाढवायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा‍ो.) :-**

आपण किती जास्त वाढवायला पाहिजे ही याच्या मागची धारणा राहिल.

**रतन पाटील :-**

माझे मत असे आहे की दहा टक्केपेक्षा जास्त वाढवायला पाहिजे होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. घेवारे साहेबांचे मतसुध्दा योग्य आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण याच्या व्यतिरिक्त तात्कालीन परिस्थितीमध्ये असा विचार केलेला आहे की आापल्याला ती जागा घेण्यासाठी पैसे लागतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्याला पैसे द्यावे लागत नाहीत. फक्त टी.डी.आर. द्यावा लागतो आणि टी.डी.आर.चे फक्त पेपर्स द्यावे लागतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

जमीन घेण्यासाठी पैशाची बाब आवश्यक असते. निगोशिएशन किंवा लॅन्ड ॲक्विझीशन, त्या अनुषंगाने पैसे लागले असतील, आपल्याला डेव्हलपमन्टसाठी पैसे लागले असतील.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही ही जी माहिती मागवलेली आहे. ती तुम्ही तुमच्या मतानुसार मागवलेली आहे. परंतु, मागच्या सभापतींकडून माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागवावी लागते. कारण या ठिकाणी असे लिहिलेले आहे की, आज दि. २६/६/२००६ रोजीच्या माहितीच्या अधिकाराचे पत्र. याचा अर्थ तुम्ही आमच्या मा. सभापतींचा अपमान करित आहात. तुमचाच संदर्भ आहे. जर मा. सभापती साहेबांना अशा पध्दतीने माहिती मागवावी लागत असेल तर आपली काय हालत असायला पाहिजे? याचा विचार करा.

**मा. सभापती :-**

या ठिकाणी हे चुकीचे लिहिलेले आहे.

**रतन पाटील :-**

हा विषय चुकीचा आहे.

**मा. सभापती :-**

मी माहितीच्या अधिकाराखाली एक महिन्याच्या उत्तराची माहिती मागितलेली आहे.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, या ठिकाणी तुमच्या पत्राचा संदर्भ दिलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही हा विषय पुढच्या वेळेला घ्या. या विषयाचे ॲग्रीमन्ट काय झाले? वगैरे मागवून घ्या. शेतकऱ्याला जमीन मिळाली की नाही ते बघा.

**कैलासबेन जानी :-**

हा विषय पुढच्या वेळेला घेण्यात यावा.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही हा विषय सर्व कागदपत्रासंहित पुढच्या वेळेला आणा.

**मा. सभापती :**

हा विषय पुढच्या मिंटीगमध्ये घेण्यात यावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण विकासकर्ता आणि खाजगी जागेच्या मालकाकडून सर्व पेपर्स आणून त्यांनी कुठल्या वर्षी जमिन खरेदी केलेली आहे त्यांची तपासणी करुया.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही विकासकर्ता आणि खाजगी जागेच्या मालकाला समोरासमोर बोलवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. घेवारे साहेब सांगतात की, आपण सन २००० मध्ये संबंधित कस्ट्रक्शनला काम दिलेले आहे.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही त्यांना समोरासमोर बोलावले तर आपल्याला माहिती पडेल.

**सुर्यकांत भोईर :-**

सन २००५ रोजी त्या बिल्डरने जमीन ताब्यात घेतलेली आहे असे म्हणता तर तुम्ही सन २००० मध्ये कुठल्या बेसवर परवानगी दिलेली आहे? ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

पहिली परवानगी सन २००० मध्ये दिलेली आहे.

**दिलीप घेवारे :-**

आपण सन २००० मध्ये परवानगी दिलेली आहे असे मी बोललो नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

परंतु, विकासक तोच आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्या विकासकाने प्रत्येक वर्षी परवानगी रिन्यू केलेली आहे का? ते सर्व पेपर्स किंवा ॲग्रीमेंन्ट वैगरे घेऊन यायला सांगा.

**कैलासबेन जानी :-**

पंचायत समितीने ठराव केला आणि आता परमिशन दिली असा अर्थ झाला.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ५५ संक्रमण शिबिराची जागा उपलब्ध करुन देण्याबाबत. हा विषय संपुर्ण माहितीसह नगरसेवकांची गैरसोय होणार नाही. म्हणजेच नगरसेवकांचे एकमेकांबद्दल गैरसमज होणार नाहीत या हिशेबाने पुढील दिशा ठरविण्याच्या उद्देशाने पुढच्या मिटिंगला घेण्यात यावा असे मी रुलिंग देतो.

**गजानन भोईर :-**

आमची ही अंतिम मिटिंग आहे. त्यामुळे हा विषय पुढच्या मिटिंगमध्ये कधी घेणार ते सांगा.

**प्रकरण क्र. ५५ :-**

संक्रमण शिबीरासाठी जागा उपलब्ध करणेबाबत.

**ठराव क्र. ५७ :-**

मा. सभापती सोा. यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५६ चे वाचन केले.)

**मा. सभापती:-**

आपल्याला या विषयाची संपूर्ण माहिती मिळाल्याशिवाय आपल्याला या विषयाचा आढावा घेता येणार नाही .

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतू, या विषयाचा गोषवारा दिलेला नाही या विषयाचा आढावा घेतला नाही तर तुम्ही या विषयाचा गोषवारा द्यायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

तुम्ही या विषयाची संपुर्ण गोषवाऱ्यासहीत माहिती द्या. मग आम्ही हा विषय पुढच्या मिटिंगला घेतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिवांनी हा विषय मिटिंगला घेण्याबाबत सांगायला पाहिजे होते. आम्ही आढावा मागितलेला आहे असे सचिवांनी सागूंन पुढच्या मिंटिगला आढावा द्यायला पाहिजे.

**नगरसचिव :-**

त्या विभागाकडून हा विषय यायला पाहिजे होता.

**ध्रुवकिशोर पाटिल :-**

परंतु , तुम्ही विषय आणतांना त्या विभागाला कळविले पाहिजे होते.

**नगरसचिव :-**

मी माझे काम केलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही पुढच्या वेळेला या विषयाचा आढावा घेवून येणे आवश्यक आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही पुढच्या मिटिंगला संबधित विषयाचा आढावा घेउुन या.

**प्रकरण क्र. ५६ :-**

सन २००६-२००७ सालाचे अंदाजपत्रकांचा आढावा घेणे.

**ठराव क्र. ५८ :-**

मा. सभापती सोा. यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५७ चे वाचन केले. )

**प्रकरण क्र. ५७ :-**

मा. आयुक्त सोा. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)

ठराव क्र. ५९ :-

imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It maa.nagarsaovak inaQaI¸ p`Baaga saimatI inaQaI va [tr inaQaI maQaUna kravayaacaI KalaIla kamao ijalha majaUr saaosaayaTImaaf-t k$na GaoNyaasa tsaoca inaivadaMnaa maa.Aayau@t yaaMnaI maMjaUrI idlaolaI Aaho.

| A. Ë. | kamaacao naava | AMdaijat Kca- | ijalha majaUr saaosaayaTIcao naava |
|---|---|---|---|
| 1 | imararaoD p`Baaga Ë.15 maQyao gaTaro sla^ba du$stI va Aar.saI.saI. maona haola kvhr purvaza k$na basaivaNao. | $.5,¸00¸000 À¹ | EaIjayaAMbao majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.ija.zaNao |
| 2 | imara gaavazaNa gaaMvadovaI kMpa}MD yaoqaIla naalaa du$stI k$na laaoKMDI rolaIMga basaivaNao. | $.4¸92¸000 À¹ | EaIjayaAMbao majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.ija.zaNao |
| 3 | Baa[-Mdr³p.´ ToMBaa Ëa^sa raoD yaoqaIla sadasa%ya [maartIsamaaor gaTar baaMQaUna sla^ba TakNao. | $.5¸00¸000 À¹ | p`SaaMt majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.AMbarnaaqa¸ ija.zaNao. |
| 4 | Baa[-Mdr³p.´ gauNavaMtrava i~vaoNaI maaga- yaoqaIla puYpa inakotna yaoqao gaTar baaMQaUna sla^ba TakNao. | $.5¸00¸000 À¹ | p`SaaMt majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.AMbarnaaqa¸ ija.zaNao. |
| 5 | Baa[-Mdr³p.´ mauQaa- to caaOk BaagaatIla SaaOcaalayaavar paNyaacyaa Ta@yaa basaivaNao. | $.5¸00¸000 À¹ | mao. gau$d%t majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-.ta.klyaaNa¸ ija.zaNao |
| 6 | Baa[-Mdr³p.´ saalaasar va`jaBaUmaI samaaor gaTar baaMQaUna sla^ba TakNao. | $.5¸00¸000 À¹ | p`SaaMt majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.AMbarnaaqa¸ ija.zaNao. |
| 7 | Baa[-Mdr³p.´ maqaurakMuja [maartI samaaor gaTar baaMQaUna sla^ba TakNao. | $.5¸00¸000 À¹ | p`SaaMt majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.AMbarnaaqa¸ ija.zaNao. |
| 8 | Baa[-Mdr³p.´ mauQaa- to caaOk BaagaatIla SaaOcaalaya du$stI krNao. | $.5¸00¸000 À¹ | saaohma majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.iBavaMDI¸ ija.zaNao. |

| A. Ë. | kamaacao naava | AMdaijat Kca- | ijalha majaUr saaosaayaTIcao naava |
|---|---|---|---|
| 9 | भाईदर (प) भागातील सार्वजनिक शौचालय दुरूस्ती करणे. | रू. ५,००,०००/- | saaohma majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.iBavaMDI¸ ija.zaNao. |
| 10 | मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीतील भाईदर मराठी शाळा क्र. १६ मध्ये संगणक लॅब बांधणे. | रू. १,८१,७९६ /- | तिरूपती मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे. |
| 11 | भाईदर (पूर्व) नवघर गांव नविन तलाव व उद्यानास गेट, ग्रील व दुरूस्ती करून कलरींग करणे. | रू. ३,०४,३२५ /- | गांवदेवी मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे. |
| 12 | मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीतील मोर्वा मराठी शाळा क्र. २४ मध्ये संगणक लॅब बांधणे. | रू. १,८१,७९६ /- | तिरूपती मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे. |

**id.07À07À2006 raojal “dO.gaujaratI janmaBaUmalÀgaaMvakrI” inaivada Ë.33**

| A. Ë. | kamaacao naaMvaÀ zokodaracao naava | AMdaijat r@kma |
|---|---|---|
| 13 | ]%tna ivaBaagaat AignaSaamana koMd` ]BaarNao.<br>1´ mao.lailat kMnsT/@Sana<br>2´ mao.gajaanana kMnsT/@Sana<br>**3´ mao.mainaYaa kMnsT/@Sana kMpnaI ³drvaaTaGaaTInaMtr´**<br>4´ mao.esa.ema.kMnsT/@Sana | $.8¸48¸595À[1]<br>20.00‰ jaast dranao<br>17.00‰ jaast dranao<br>**12.00‰ jaast dranao**<br>**9.00‰ jaast dranao**<br>22.00‰ jaast dranao |

**id.07À07À2006 raojal “dO.saamanaaÀmauMba[- saMQyaa” inaivada Ë.35**

| A.Ë. | kamaacao naaMva | AMdaijat r@kma | |
|---|---|---|---|
| | | **mao.ivajaya iSargaaMvakr ³iSalpkar´** | mao.imalana AaT-enaga`ovhsa- |
| 14 | imara[1]Baa[-Mdr mahanagarpailaka mau#ya kayaa-layaacyaa p`aMgaNaat Da^.baabaasaahoba AaMbaoDkr yaaMcaa AQaa-kRtI ³3 fuTI´ putLyaacao @lao maa^Dola tyaar k$na klaa | **$.1¸30¸000À[1]** | $.1¸73¸535À[1] |

| | | | |
|---|---|---|---|
| | saMcaalanaalayaacaI maanyata Gao}na ba`a^nsa Qaatucaa putLa banaivaNao va ]BaarNaI krNao. | | |

**id.30À06À2006 raojaI imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka baaoDa-var p`isaQd JaalaolaI jaaihr kaoToSana naaoTIsa**

| A. Ë. | kamaacao naaMvaÀ zokodaracao naava | AMdaijat r@kma |
|---|---|---|
| 15 | imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It Baa[-Mdr³pU.´ navaGar gaavaacyaa pazImaagaIla KaDIlagat Asalaolaa baaMQa du$stI krNao.<br>**1´ mao.gajaanana kMnsT/@Sana**<br>2´ mao.ekta kMnsT/@Sana<br>3´ mao.ema.esa.enTrp`ayajaosa | $.47¸131À¹<br><br>**AMdajap~kIya dranao**<br>2.50‰ jaast dranao<br>3.50‰ jaast dranao |

varIla pOkI A.Ë. 1 to 12 hI kamao AMdajap~k dranao ijalha majaUr saaosaayaTI maaf-t k$na GaoNyaasa व A.Ë. 13 to 15 या कामाकरीता ठेकेदारांनी सादर केलेल्या निविदा मधील सर्वात कमी निविदा धारकाकडून काम करून घेण्यास व निविदास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. सदर अ.क्र. १ ते ३ कामांचे mauMba[- p`aMitk mahanagarpailaka AiQainayama 1949 cao klama 73³D´ nausaar अवलोकन krNyaat आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५८ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ५८ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (वन विभाग)

**ठराव क्र. ६० :-**

**१) भाडे तत्वावर ट्रॅक्टर घेणेबाबत**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकरिता ट्रॅक्टर भाडे तत्वावर घेणेबाबत मा. आयुक्त साो यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामे दि. १८/४/२००६ रोजी दै. सामना या वृत्तपत्रांत जाहीर केलेल्या निविदा सुचनेप्रमाणे खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | वाहनांचा तपशिल | श्री. अनिल परशुराम पाटील | श्री. शिवनाथ रामअजोर शर्मा | फारुक कुरेशी |
|---|---|---|---|---|
| १. | ट्रॅक्टर | ५१,२५०/- प्र.माहिना (२५०० किमी) | ५४,९००/- प्र.माहिना (२५०० किमी) | ५३,१००/-प्र. माहिना (२५०० किमी) |
| २. | ट्रॅक्टर | १,५५०/-प्र. दिवस (८० किमी) | १,८५०/- प्र. दिवस (८० किमी) | १,८००/- प्र. दिवस (८० किमी) |
| ३. | ट्रॅक्टर | ३०/- प्र. किमी (८० किमी नंतर प्र. किमी) | ४०/- प्र. किमी (८० किमी नंतर प्र.किमी) | ३५/-प्र. किमी (८० किमी नंतर प्र. किमी) |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता 'श्री. अनिल परशुराम' पाटील यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराच्या निविदा स्विकारणेस मा. आयुक्त साो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

**२) भाडे तत्वावर महिंद्रा मॅक्स (पिक-अप) टेंम्पो घेणेबाबत**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकरिता टेंम्पो भाडे तत्वावर घेणेबाबत मा. आयुक्त साो यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामे दि. १८/४/२००६ रोजी दै. सामना या वृत्तपत्रांत जाहीर केलेल्या निविदा सुचनेप्रमाणे खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | तपशिल | मे. ॲनायडा इंटरप्रायजेस | मे. एस. के. ट्रान्सपोर्ट | मे. खान ट्रान्सपोर्ट |
|---|---|---|---|---|
| १. | महिंद्रा मॅक्स (पिक-अप) | ४९,२००/- प्र. माहिना (२५०० किमी) | ४७,७००/- प्र. माहिना (२५०० किमी) | ५०,१००/- प्र. माहिना (२५०० किमी) |
| २. | महिंद्रा मॅक्स (पिक-अप) | १,६४०/- प्र. दिवस (८० किमी) | १३५०/- प्र. दिवस (८० किमी) | १,६७०/- प्र. दिवस (८० किमी) |
| ३. | महिंद्रा मॅक्स (पिक-अप) | २८/- प्र. किमी (८० किमी नंतर प्र. किमी) | २६/- प्र. किमी (८० किमी नंतर प्र. किमी) | ३०/-प्र. किमी (८० किमी नंतर प्र. किमी) |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता 'मे. एस. के. ट्रान्सपोर्ट' पाटील यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराच्या निविदा स्विकारणेस मा. आयुक्त साो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

**३) लालमाती, शेणखत, सफेद रेती खरेदी करणेबाबत**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकरिता लालमाती, शेणखत, सफेद रेती खरेदी करणेबाबत मा. आयुक्त साो यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामे दि. १९/४/२००६ रोजी दै. सुरज प्रकाश व दै. वृत्तमानस या वृत्तपत्रांत जाहीर केलेल्या निविदा सुचनेप्रमाणे खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| अ. क्र. | तपशिल | मे. दिक्षा इंटरप्रायजेस | मे. भुषण ट्रान्सपोर्ट | मे. गुरुदत्त कंन्स्ट्रक्शन | मे. सागर इंटरप्रायजेस | मे. स्नेहल इंटरप्रायजेस | मे. यश इंटरप्रायजेस | मे. जयंत कंन्स्ट्रक्शन | मे. एस.एम. कंन्स्ट्रक्शन | मे. प्रथम इंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | लालमाती | ८५०/- प्र. ब्रास | ८०५/- प्र. ब्रास | ८५०/- प्र. ब्रास | ८५५/- प्र. ब्रास | ८७५/- प्र. ब्रास | ८१०/- प्र. ब्रास | ८३५/- प्र. ब्रास | ८२५/- प्र. ब्रास | ८९०/- प्र. ब्रास |
| २. | शेणखत | ९००/- प्र. ब्रास | ७४५/- प्र. ब्रास | ८१०/- प्र. ब्रास | ८१०/- प्र. ब्रास | ८३५/- प्र. ब्रास | ७५०/- प्र. ब्रास | ८२५/- प्र. ब्रास | ८०१/- प्र. ब्रास | ८३०/- प्र. ब्रास |
| ३. | सफेद रेती | ३०००/- प्र. ब्रास | २०५०/- प्र. ब्रास | २३००/- प्र. ब्रास | २४७५/- प्र. ब्रास | २२२२/- प्र. ब्रास | २०६०/- प्र. ब्रास | २३१०/- प्र. ब्रास | २२२२/- प्र. ब्रास | २२५०/- प्र. ब्रास |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता 'मे. भुषण ट्रान्सपोर्ट' यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराच्या निविदा स्विकारणेस मा. आयुक्त साो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

**४) वृक्षारोपण करिता संरक्षण जाळ्या लहान (ट्री गार्ड) सोबतच्या नकाशाप्रमाणे पुरवठा करणे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकरिता लहान पिंजरे खरेदी करणेबाबत मा. आयुक्त साो यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामे दि. १९/४/२००६ रोजी दै. सुरज प्रकाश व दै. वृत्तमानस या वृत्तपत्रांत जाहीर केलेल्या निविदा सुचनेप्रमाणे खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| अ. क्र. | तपशिल | मे. गुरुदत्त कंन्स्ट्रक्शन | मे. प्रथम इंटरप्रायजेस | मे. स्नेहल इंटरप्रायजेस | मे. एस.एम. कंन्स्ट्रक्शन | मे. जयंत कंन्स्ट्रक्शन | मे. यश इंटरप्रायजेस | मे. दिक्षा इंटरप्रायजेस | मे. व्होरा इंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वृक्षारोपण करिता संरक्षण जाळ्या लहान (ट्री गार्ड) सोबतच्या नकाशाप्रमाणे पुरवठा करणे. | १३७५/- प्र. नग | १४२५/- प्र. नग | १३१०/- प्र. नग | १३६५/- प्र. नग | १४००/- प्र. नग | १२७५/- प्र. नग | १३१०/- प्र. नग | १२१०/- प्र. नग |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता 'मे. व्होरा इंटरप्रायजेस' यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराच्या निविदा स्विकारणेस मा. आयुक्त साो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

**५) वृक्षारोपण करिता संरक्षण जाळ्या मोठ्या (ट्री गार्ड) सोबतच्या नकाशाप्रमाणे पुरवठा करणे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकरिता मोठे पिंजरे खरेदी करणेबाबत मा. आयुक्त साो यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामे दि. १९/४/२००६ रोजी दै. सुरज प्रकाश व दै. वृत्तमानस या वृत्तपत्रांत जाहीर केलेल्या निविदा सुचनेप्रमाणे खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| अ. क्र. | तपशिल | मे. गुरुदत्त कंन्स्ट्रक्शन | मे. प्रथम इंटरप्रायजेस | मे. स्नेहल इंटरप्रायजेस | मे. एस.एम. कंन्स्ट्रक्शन | मे. जयंत कंन्स्ट्रक्शन | मे. यश इंटरप्रायजेस | मे. दिक्षा इंटरप्रायजेस | मे. व्होरा इंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वृक्षारोपण करिता संरक्षण जाळ्या मोठ्या (ट्री गार्ड) सोबतच्या नकाशाप्रमाणे पुरवठा करणे. | १३५०/- प्र. नग | १२५०/- प्र. नग | १४००/- प्र. नग | १३२५/- प्र. नग | १३७५/- प्र. नग | १२२०/- प्र. नग | १३००/- प्र. नग | ११७६/- प्र. नग |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता 'मे. व्होरा इंटरप्रायजेस' यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराच्या निविदा स्विकारणेस मा. आयुक्त साो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

**६) ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करणेबाबत.**

महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागास ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करणेबाबत मा. आयुक्त साो यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामे दि. २९/४/२००६ रोजी दै. मुंबई संध्या व दै. सामना या वृत्तपत्रांत जाहीर केलेल्या निविदा सुचनेप्रमाणे खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ. क्र. | तपशिल | मे. शंभो महादेव मजुर सहकारी संस्था | मे. गौरव कंस्ट्रक्शन | मे. ओम गणेश मजुर कामगार सहकारी संस्था (मर्यादीत) | मे. समकित इंजिनियर | मे. हर्षद इंटरप्रायजेस | मे. दिक्षा इंटरप्रायजेस | मे. गावदेवी मजुर कामगार सहकारी संस्था (मर्यादीत) | मे. साईराज कंस्ट्रक्शन | मे. सागर इंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ठेकापध्दतीने स्त्री/पुरुष मजुर पुरवठा करणे. | रु.१२७.३५/- प्र. मजुर | रु. ११८/- प्र. मजुर | रु. १२०/- प्र. मजुर | रु.१६५/- प्र. मजुर | रु.१०९.५०/- प्र. मजुर | रु. १६१/- प्र. मजुर | रु.१३९.९०/- प्र. मजुर | रु.१४२.४०/- प्र. मजुर | रु.१५९.५०/- प्र. मजुर |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता 'मे. हर्षद इंटरप्रायजेस' यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराच्या निविदा स्विकारणेस मा. आयुक्त साो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

**७) महानगरपालिकेच्या खारपट्टी रोडवर व मोकळ्या जागेत टी. डी.नारळांची लागवड करणेबाबत.**

महानगरपालिका क्षेत्रातील खारपट्टी रोडवर व मोकळ्या जागेत नारळांची पुरवठा करुन लागवड करणेबाबत मा. आयुक्त साो यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामे दि. १९/४/२००६ रोजी दै. सुरज प्रकाश व दै. वृत्तमानस या वृत्तपत्रांतील जाहीर केलेल्या निविदा सुचनेप्रमाणे खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ. क्र. | तपशिल | मे. गुरुदत्त कंन्स्ट्रक्शन | मे. दिक्षा इंटरप्रायजेस | मे. जयंत कंन्स्ट्रक्शन | मे. सागर इंटरप्रायजेस | मे. एस.एम. कंन्स्ट्रक्शन | मे. यश इंटरप्रायजेस | मे. प्रथम इंटरप्रायजेस | मे. स्नेहल इंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बाणावली व टी.डी. नारळ अंदाजे ६ ते ८ पाणे असलेला व सुमारे ३ ते ३.५ फुट उंचीचे रोपे. | १६८/- प्र. रोप | १५९/- प्र. रोप | १६५/- प्र. रोप | १४०/- प्र. रोप | १७५/- प्र. रोप | १५५/- प्र. रोप | १६५/- प्र. रोप | १५२.५०/- प्र. रोप |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता 'मे. सागर इंटरप्रायजेस' यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराच्या निविदा स्विकारणेस मा. आयुक्त साो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

**८) शोभिवंत झाडे, अतिशोभिवंत झाडे, फुलांची झाडे, हंगामी फुलझाडे, कुंड्या खरेदी करणेबाबत**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकरिता शोभिवंत झाडे, अतिशोभिवंत झाडे, फुलांची झाडे, हंगामी फुलझाडे, कुंड्या खरेदी करणेबाबत मा. आयुक्त साो यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामे दि. १९/४/२००६ रोजी दै. सुरज प्रकाश व दै. वृत्तमानस या वृत्तपत्रांत जाहीर केलेल्या निविदा सुचनेप्रमाणे खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| अ. क्र. | तपशिल | मे. गुरुदत्त कंन्स्ट्रक्शन | मे. दिक्षा इंटरप्रायजेस | मे. जयंत कंन्स्ट्रक्शन | मे. सागर इंटरप्रायजेस | मे. एस.एम. कंन्स्ट्रक्शन | मे. यश इंटरप्रायजेस | मे. प्रथम इंटरप्रायजेस | मे. स्नेहल इंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्लास्टिक गोलाकार कुंड्या (साईज९''x १२'') | १३८/- प्र. नग | १२०/- प्र. नग | १४०/- प्र. नग | १३०/- प्र. नग | १३५/- प्र. नग | १२५/- प्र. नग | १३५/- प्र. नग | १३५/- प्र. नग |
| २. | फायबर कुंड्या (साईज१२''X१४'') | १३१०/- प्र. नग | १२५०/- प्र. नग | १३२५/- प्र. नग | १३५०/- प्र. नग | १३००/- प्र. नग | १२७५/- प्र. नग | १३२५/- प्र. नग | १३७५/- प्र. नग |
| ३. | हंगामी फुलझाडे | ३५/- प्र. रोप | २५/- प्र. रोप | ३६/- प्र. रोप | ३०/- प्र. रोप | ३३/- प्र. रोप | ३०/- प्र. रोप | ३२/- प्र. रोप | ३५/- प्र. रोप |
| ४. | क्रोटन | ३५/- प्र. रोप | २४/- प्र. रोप | ३६/- प्र. रोप | ३०/- प्र. रोप | ३५/- प्र. रोप | २६/- प्र. रोप | २८/- प्र. रोप | ३३/- प्र. रोप |
| ५. | गोल्डन धुरांडा | १५/- प्र. रोप | ९/- प्र. रोप | १४/- प्र. रोप | १५/- प्र. रोप | १३/- प्र. रोप | ११/- प्र. रोप | १३/- प्र. रोप | १२/- प्र. रोप |
| ६. | प्लेमेंगो | १८/- प्र. रोप | १२/- प्र. रोप | २०/- प्र. रोप | २५/- प्र. रोप | २०/- प्र. रोप | १४/- प्र. रोप | १५/- प्र. रोप | १७/- प्र. रोप |
| ७. | लेंटेंना मिक्स | २०/- प्र. रोप | १४/- प्र. रोप | २१/- प्र. रोप | २२/- प्र. रोप | २०/- प्र. रोप | १६/- प्र. रोप | १८/- प्र. रोप | १८/- प्र. रोप |
| ८. | अकेलिफा | १४/- प्र. रोप | ८/- प्र. रोप | १५/- प्र. रोप | १२/- प्र. रोप | १२/- प्र. रोप | १०/- प्र. रोप | १५/- प्र. रोप | ११/- प्र. रोप |
| ९. | बोगणवेल | २१/- प्र. रोप | १५/- प्र. रोप | २३/- प्र. रोप | २२/- प्र. रोप | २०/- प्र. रोप | १८/- प्र. रोप | ३४/- प्र. रोप | १९/- प्र. रोप |
| १०. | मुसांडा | ४५/- प्र. रोप | २८/- प्र. रोप | ४०/- प्र. रोप | ३५/- प्र. रोप | ३५/- प्र. रोप | ३०/- प्र. रोप | ३७/- प्र. रोप | ३२/- प्र. रोप |
| ११. | मिनीचर अेक्झोरा | ३१/- प्र. रोप | २५/- प्र. रोप | ३३/- प्र. रोप | ३५/- प्र. रोप | ३०/- प्र. रोप | २८/- प्र. रोप | ३८/- प्र. रोप | २९/- प्र. रोप |
| १२. | गोल्डन अरेलिया | ३४/- प्र. रोप | २८/- प्र. रोप | ३५/- प्र. रोप | ३५/- प्र. रोप | ३३/- प्र. रोप | ३०/- प्र. रोप | ३५/- प्र. रोप | ३२/- प्र. रोप |
| १३. | शोभिवंत मिक्स रोपे | ६०/- प्र. रोप | ४८/- प्र. रोप | ६१/- प्र. रोप | ६५/- प्र. रोप | ६०/- प्र. रोप | ५२/- प्र. रोप | ७०/- प्र. रोप | ५५/- प्र. रोप |
| १४. | अतिशोभिवंत मिक्स रोपे | ८०/- प्र. रोप | ७३/- प्र. रोप | ८५/- प्र. रोप | ९०/- प्र. रोप | ८०/- प्र. रोप | ७५/- प्र. रोप | ९५/- प्र. रोप | ८३/- प्र. रोप |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता 'मे. दिक्षा इंटरप्रायजेस' यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराच्या निविदा स्विकारणेस मा. आयुक्त साो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

**९) मिरारोड सेक्टर क्र. ३ प्रभाग क्र. १५ येथे लालमाती भराव करुन लॅन्ड स्केपींग करणेबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मिरारोड सेक्टर क्र. ३ प्रभाग क्र. १५ येथे लॅन्ड स्केपींग करणेबाबत मागील उद्यानामध्ये काम करणारे ठेकेदार मे. दिक्षा इंटरप्रायजेस हे मागील दराप्रमाणे लॅन्ड स्केपींगचे काम करुन देण्यास तयार असुन शासन निर्णय क्रमांक एस.पी.ओ.१०८८/२५१२/उद्योग-६ मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक २ जानेवारी १९९२ नुसार पुर्णप्रत्यापी आदेश देण्याचे शासनाने निर्देश दिले आहेत. 'मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १४९ चे प्रकरण ७ संविदा कलम ७३ महापालिकेच्या वतीने संविदा करुन देण्याचा आयुक्तांचा अधिकार ७३ (ड)' नुसार मा. आयुक्त, साो. यांची मंजुरी दिलेली आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | परिमाण | मंजुर दर |
|---|---|---|---|
| १. | क्रोटन | १२५ रोपे | २४/- प्र. नग |
| २. | गोल्डन धुरांडा | २५०० रोपे | ०९/- प्र. नग |
| ३. | जास्वंदी मिक्स | १५० रोपे | २३/- प्र. नग |
| ४. | आरिका पाम | ३० रोपे | ४८/- प्र. नग |
| ५. | वेली मिक्स | १३० रोपे | १८/- प्र. नग |
| ६. | गोल्डन अरेलिया | १० रोपे | २८/- प्र. नग |

| अ.क्र. | कामाचा तपशिल | परिमाण | मंजुर दर |
|---|---|---|---|
| ७. | टेबल पाम | २० रोपे | ४६/- प्र. नग |
| ८. | मिनिचर अेक्झोरा | ५० रोपे | २५/- प्र. नग |
| ९. | मधुकामिनी | २५ रोपे | ४३/- प्र. नग |
| १०. | मुसांडा | ५० रोपे | २८/- प्र. नग |
| ११. | प्लेमेंगो | २०० रोपे | १४/- प्र. नग |
| १२. | लेटिना मिक्स | ५० रोपे | १४/- प्र. नग |
| १३. | बाटल पाम | १० रोपे | ५०/- प्र. नग |
| १४. | अतिशोभिवंत मिक्स रोपे | २०० रोपे | ७३/- प्र. नग |
| १५. | शोभिवंत मिक्स रोपे | १०० रोपे | ४८/- प्र. नग |
| १६. | वरिल प्रमाणे रोपांची लागवड करण्यापुर्वी ९० से.मी **X** ९० से.मी. **X** ९० से.मी.चे खड्डे खोदणे, खोदलेली माती काढुन टाकणे, त्यात चांगल्या व योग्य प्रमाणात किटकनाशक पावडर, वाळू, लालमाती, शणेखत मिश्रण करुन खड्डे भरणे व त्यात झाडे लावणे. | ३६५० रोपे | १७०/- प्र. नग |
| १७. | जमिनीवरचे खड्डे व टेप कटींग/ फिलींग करुन जमिनीला लेव्हल करणे. | ६१८४ चौ.फुट | १.५०/- प्र. चौ.फुट |
| १८. | उगवलेले रान मुळासकट उपटून त्याचाच योग्य त्या जागेवर निकाल लावणे. | ६१८४ चौ.फुट | १.००/- प्र. चौ.फुट |
| १९. | जंपींग लॉन | ६१८४ चौ.फुट | २४/- प्र. चौ.फुट |

**१०) राई गांधी तलाव येथे लालमाती भराव करुन लॅण्ड स्केपींग करण्याबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका राई गांधी तलाव येथे माती भराव करुन लॅण्ड स्केपींग करण्याबाबत मागील उद्यानामध्ये काम करणारे ठेकेदार मे. दिक्षा इंटरप्रायेजस हे मागील दराप्रमाणे काम करुन देण्यास तयार असुन शासन निर्णय क्रमांक एस. पी. ओ. १०८८/२५१२/उद्योग-६ मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक २ जानेवारी १९९२ नुसार पुर्णप्रत्यापी आदेश देण्याचे शासनाने निर्देश दिले आहेत. 'मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १४९ चे प्रकरण ७ संविदा कलम ७३ महापालिकेच्या वतीने संविदा करुन देण्याचा आयुक्तांचा अधिकार ७३(ड)' नुसार मा. आयुक्त, सो. यांची मंजुरी दिलेली आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | परिमाण | मंजुर दर |
|---|---|---|---|
| १. | क्रोटन | २५ रोपे | २४/- प्र. नग |
| २. | गोल्डन धुरांडा | २०५० रोपे | ०९/- प्र. नग |
| ३. | जास्वंदी मिक्स | ५० रोपे | २३/- प्र. नग |
| ४. | आरिका पाम | २५ रोपे | ४८/- प्र. नग |
| ५. | वेली मिक्स | ७५ रोपे | १८/- प्र. नग |
| ६. | गोल्डन अरेलिया | ३५ रोपे | २८/- प्र. नग |
| ७. | टेबल पाम | २० रोपे | ४६/- प्र. नग |
| ८. | मिनिचर अेक्झोरा | ५० रोपे | २५/- प्र. नग |
| ९. | मधुकामिनी | १० रोपे | ४३/- प्र. नग |
| १०. | मुसांडा | २० रोपे | २८/- प्र. नग |
| ११. | प्लेमेंगो | २०० रोपे | १४/- प्र. नग |
| १२. | लेटिना मिक्स | ५० रोपे | १४/- प्र. नग |
| १३. | बाटल पाम | १५ रोपे | ५०/- प्र. नग |
| १४. | अतिशोभिवंत मिक्स रोपे | २०० रोपे | ७३/- प्र. नग |
| १५. | शोभिवंत मिक्स रोपे | १०० रोपे | ४८/- प्र. नग |
| १६. | वरिल प्रमाणे रोपांची लागवड करण्यापुर्वी ९० से.मी **X** ९० से.मी. **X** ९० से.मी.चे खड्डे खोदणे, खोदलेली माती काढुन टाकणे, त्यात चांगल्या व योग्य प्रमाणात किटकनाशक पावडर, वाळू, लालमाती, शेणखत मिश्रण करुन खड्डे भरणे व त्यात झाडे लावणे. | २९२५ रोपे | १७०/- प्र. नग |
| १७. | जमिनीवरचे खड्डे व टेप कटींग/ फिलींग करुन | ९१०० चौ.फुट | १.५०/- प्र. चौ.फुट |

| अ.क्र. | कामाचा तपशिल | परिमाण | मंजुर दर |
|---|---|---|---|
| | जमिनीला लेव्हल करणे. | | |
| १८. | उगवलेले रान मुळासकट उपटून त्याचाच योग्य त्या जागेवर निकाल लावणे. | ९१०० चौ.फुट | १.००/- प्र. चौ.फुट |
| १९. | जंपींग लॉन | ९१०० चौ.फुट | २४/- प्र. चौ.फुट |

वरील प्रस्तावाचे अवलोकन करुन ही स्थायी समिती मंजुरी देत आहे

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जयंत पाटील :-**

श्री. गणेश पाटील यांनी आपल्या विभागात नारळाची झाडे लावल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला पाहिजे. कारण त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नातमध्ये वाढ झालेली आहे.

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग, आणि मनपा कर्मचारी वर्ग आपण सर्वांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल आपणा सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ०४.०० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**